दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
संपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ६ वे अंक -३०१ शुक्रवार दि.१० जुलै २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४
Beed Daily Marathi Year-6th Issue-301 Friday, Dt.10 July 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

# 'ज्ञानराधा'च्या ३९ हजार ठेवीदारांना दिलासाची आशा!

## ठेवी विनाविलंब परत द्या, प्रक्रियेला तातडीने गती द्या - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

बीड । प्रतिनिधी

ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीमध्ये आयुष्यभराची बचत अडकलेल्या हजारो ठेवीदारांसाठी दिलासादायक घडामोड घडली आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी या प्रकरणाचा विशेष आढावा घेत ठेवीदारांचे पैसे विनाविलंब आणि पारदर्शक पद्धतीने परत मिळण्यासाठी आवश्यक ती सर्व प्रक्रिया तातडीने राबविण्याचे निर्देश प्रशासनाला दिले. न्यायालयाकडे आवश्यक अधिसूचना काढण्याची प्रक्रिया गतीने पूर्ण करण्याचे आदेशही त्यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस यांनी संपूर्ण प्रकरणाचा सविस्तर आढावा घेतला. बैठकीला जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष

पान २ वर....

### ठळक मुद्दे...

* ३९,०७६ ठेवीदारांचे पैसे अडकले आहेत. *२५० स्थावर, ७४ जंगम मालमत्ता आणि ४० बँक खाती जप्त. * प्रारंभिक मूल्यांकन १७२.०३ कोटी, तर पोलिस विभागाने जप्त मालमत्तेचे मूल्य ३९९.०३ कोटी इतके नमूद केले.*व्यावसायिक मूल्यांकन झाल्यास मालमत्तेची किंमत सुमारे चारपट वाढू शकते, असा प्रशासनाचा अंदाज.*लिलाव प्रक्रिया जलद करण्यासाठी बीडमध्ये स्वतंत्र न्यायालय स्थापन करण्याचा प्रस्ताव उच्च न्यायालयाकडे सादर.




### थोडक्यात पण महत्वाचे...

ज्ञानराधा प्रकरण एका नजरेत..* ठेवीदार : ३९,०७६ *जप्त स्थावर मालमत्ता : २५० *जंगम मालमत्ता : ७४ * जप्त बँक खाती : ४० * प्रारंभिक मूल्यांकन : १७२.०३ कोटी *पोलिस विभागानुसार मूल्य : ३९९.०३ कोटी *स्वतंत्र न्यायालयाचा प्रस्ताव उच्च न्यायालयाकडे *पुनर्मूल्यांकनानंतर किंमत वाढण्याची शक्यता : सुमारे ४ पट

### जप्त मालमत्तेचे पुनर्मूल्यांकन करून लिलाव प्रक्रिया वेगवान करण्याचे आदेश

#### ठेवीदारांचा पैसा कंपन्यांमध्ये वळवल्याचा आरोप..?

बैठकीत जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सांगितले की, ज्ञानराधा मल्टीस्टेटमधील ठेवीदारांच्या पैशाचा वापर करून सुरेश कुटे व त्यांच्या निकटवर्तीयांना नियमबाह्य आणि विनातारण कर्जवाटप करण्यात आले. त्यानंतर हा निधी कुटे समूहाच्या विविध कंपन्यांमध्ये वळविण्यात आला. संबंधित कंपन्यांनी या मालमत्ता विविध बँकांकडे तारण ठेवून मोठ्या प्रमाणात कर्ज उचलले. कर्ज थकीत झाल्यानंतर बँकांनी एनसीएलटीकडे दावे दाखल केले आहेत.

#### 'ठेवीदारांना न्याय मिळालाच पाहिजे'..!

मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले की, ठेवीदारांच्या आयुष्यभराच्या कष्टाची बचत परत मिळणे ही शासनाची सर्वोच्च प्राथमिकता आहे. त्यामुळे कायदेशीर प्रक्रिया जलद, पारदर्शक आणि परिणामकारक पद्धतीने पूर्ण करून ठेवीदारांना शक्य तितक्या लवकर दिलासा देण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे.

## सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभागी होण्यासाठी ३१ जुलैपर्यंत मुदत

शेतकऱ्यांनी संधीचा लाभ घ्यावा

छत्रपती संभाजीनगर, दि. ८ : नैसर्गिक आपत्ती, अवकाळी पाऊस, पूर, दुष्काळ, वादळ तसेच इतर प्रतिकूल परिस्थितीमुळे पिकांचे होणारे नुकसान लक्षात घेऊन शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण देण्यासाठी राज्य शासनाने खरीप हंगाम २०२६-२७ साठी सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना राबविली आहे. या योजनेत सहभागी होण्यासाठी ३१ जुलै २०२६ ही अंतिम मुदत निश्चित करण्यात आली असून, पात्र शेतकऱ्यांनी वेळेत नोंदणी करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन विभागीय कृषी सहसंचालक सुनील वानखेडे यांनी केले आहे.या योजनेअंतर्गत अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांसाठी कर्जदार आणि बिगर कर्जदार अशा दोन्ही प्रकारच्या शेतकऱ्यांना स्वेच्छेने सहभागी होता येणार आहे. मात्र, यासाठी -ऋठखडढ-उघ ऋशीशी खऊ असणे तसेच डिजिटल पीक सर्वेक्षण (ऊळसळींरश्र उीि र्डीीींशू - ऊउड) अंतर्गत पिकांची नोंद करणे बंधनकारक करण्यात आले आहे. भाडेतत्त्वावर शेती करणाऱ्या शेतकऱ्यांनी नोंदणीकृत भाडेकराराची माहिती पीक विमा संकेतस्थळावर अपलोड करणे आवश्यक राहील.

योजनेत सहभागी होण्यासाठी प्रति अर्ज किमान ०.१० हेक्टर क्षेत्राची अट ठेवण्यात आली आहे. विमा हप्ता म्हणून खरीप हंगामातील पिकांसाठी शेतकऱ्यांना केवळ दोन टक्के, रब्बी पिकांसाठी दीड टक्का, तर नगदी पिकांसाठी पाच टक्के हिस्सा भरावा लागणार आहे. उर्वरित विमा प्रीमियम शासनाकडून भरला जाणार आहे.

पान २ वर....

## तोहिद खान हत्या प्रकरणाची SIT मार्फत चौकशी करा - मागणी



पाटोदा । प्रतिनिधी

परळी येथील तोहिद खान खैराती खान यांच्या हत्या प्रकरणाची विशेष तपास पथक (डखढ) मार्फत निष्पक्ष व वेळबद्ध चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच पीडित कुटुंबाला न्याय, आर्थिक मदत व पुनर्वसन देण्यात यावे, या प्रमुख मागण्यांसाठी मुख्यमंत्री तथा गृहमंत्री यांना उद्देशून पाटोदा तहसीलदार यांच्यामार्फत निवेदन सादर करण्यात आले.

दिनांक ३१ मे २०२६ रोजी परळी येथे तोहिद खान यांची अत्यंत क्रूर पद्धतीने हत्या करण्यात आली. तसेच समाजमाध्यमांवर व्हायरल झालेल्या कथित ऑडिओ क्लिपची न्यायवैद्यकीय तपासणी करून त्यामधील द्वेषपूर्ण वक्तव्ये व धमक्यांची सत्यता पडताळावी. ती सत्य आढळल्यास संबंधितांविरुद्ध स्वतंत्र गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करावी, अशीही मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

या निवेदनावर पत्रकार शेख जावेद, शेख मोसिनभाऊ, पत्रकार हमीदखान पठाण, शेख मोहिद,

पान २ वर....

## अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाचा गेवराई येथे राहत्या घरात चालणाऱ्या वेश्या व्यवसायावर छापा, तीन पिडीत महिलांची सुटका



बीड /प्रतिनिधी

अनैतिक वाहतूक प्रतिबंध कक्ष बीडच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक जनाबाई सांगळे यांना दिनांक ०८/०७/२०२६ रोजी सकाळी गुप्त बातमीदारामार्फत माहीती मिळाली की, पोलीस ठाणे गेवराई हद्दीत अचानक नगर येथे बाहेर जिल्ह्यातून महिलांना बोलावून, वेश्या व्यवसाय करीत आहेत अशी माहिती प्राप्त झाली सदरची माहिती ही वरिष्ठांना देण्यात आली. त्यावरून वरिष्ठांनी पोलीस निरीक्षक निलेश एकनाथ केळे सायबर, पोलीस ठाणे बीड व सहाय्यक पोलीस निरीक्षक जनाबाई सांगळे यांना -क्ढण टीमसह सदर ठिकाणी छापा टाकण्याचे लेखी आदेश दिले. त्यावरून सायबर पोस्ट चे प्रभारी केळे सर व अ. मा. वा. प्र. कक्षाच्या प्रमुख व स्टाफसह तसेच डमी ग्राहक व दोन शासकीय पंचासह सापळापूर्व पंचनामा करून सदर ठिकाणी गेले. डमी ग्राहकास सदर ठिकाणी पाठवून खात्री केली असता तेथे असलेल्या महिला एजंटने वेश्या गमनासाठी होकार देवून त्यासाठी १००० रुपयांची मागणी केली. डमी ग्राहकाने ठरल्या प्रमाणे रक्कम देवून पोलीस पथकास ठरलेला इशारा केला असता. पोलीस पथकाने सदर ठिकाणी छापा मारला पैसे स्वीकारलेल्या महिलेला तिचे नाव गाव विचारले असता, तिने तिचे नागरबाई लक्ष्मण हातागळे रा. रामतीर्थ, बीड ह. मुक्काम अचानक नगर, गेवराई असे सांगितले. सदर महिलेची पंचासमक्ष झडती घेतली असता. डमी ग्राहकाने दिलेली नमूद वर्णनाची ५०० रू. दराची दोन नोट मिळून आल्याने ती पंचासमक्ष जप्त केली. सदर ठिकाणी तीन पीडित महिला मिळून आल्या त्यापैकी डमी ग्राहकासोबत रूम मधे मिळून आलेल्या पीडीत महिलेला विश्वासात घेवून चौकशी

पान २ वर....

## आषाढी वारीतील चरणसेवा उपक्रम उत्स्फूर्त प्रतिसादात यशस्वी











बीड /प्रतिनिधी

मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष तथा सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आषाढी वारीनिमित्त आयोजित करण्यात आलेला चरणसेवा उपक्रम बुधवार, दि. ८ जुलै २०२६ रोजी चिंतेश्वर मंदिर, गेवराई जि.बीड व टीपीएस कॉलनी परळी जिल्हा बीड येथे उत्स्फूर्त प्रतिसादात यशस्वीपणे संपन्न झाला.

मुक्ताईनगर येथून आषाढी एकादशीनिमित्त श्रीक्षेत्र पंढरपूरकडे प्रस्थान करणाऱ्या संत मुक्ताबाई पालखी दिंडीची परंपरा अनेक वर्षांपासून अखंड सुरू आहे सोबतच गजानन महाराज पालखी दिंडी शेगाव ही बीड जिल्ह्यात परळी या ठिकाणी मुक्कामस येते . या दिंडीसोबत महाराष्ट्रातील शेकडो वारकरी पायी वारी करून श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपूरकडे जातात.

वारकऱ्यांच्या पायी प्रवासामुळे होणारा शारीरिक थकवा कमी करणे, त्यांच्या पायांची व स्नायूंची योग्य काळजी घेणे तसेच आवश्यक आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे, या उद्देशाने महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून आणि गेवराई विधानसभा मतदारसंघाचे आमदार विजयराजे पंडित यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात आला. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, मंत्रालय, मुंबईचे विशेष कार्य अधिकारी तथा कक्ष प्रमुख श्री रामेश्वर नाईक, डॉ. स्वानंद सोनार तसेच जिल्हाधिकारी विवेक जॉनसन, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी आणि जिल्हा आरोग्य आधिकारी डॉ उल्हास गंडाळ यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रमाचे नियोजन करण्यात आले.

या उपक्रमात सुमारे ७० स्वयंसेवकच्या चमूने ४०० हून अधिक वारकऱ्यांना चरणसेवा व आरोग्य विभागातील वैद्यकीय अधिकारी यांनी आरोग्य तपासणी व आवश्यक औषधोपचार उपलब्ध करून दिले. तसेच फिजिओथेरपी, आयुष उपचार पद्धतीद्वारे सेवा आणि पंचकर्म उपचारही देण्यात आले. या सेवेमुळे पायी प्रवासामुळे आलेला शारीरिक थकवा दूर होऊन पुढील वारीसाठी नवचैतन्य आणि ऊर्जा मिळाल्याची भावना अनेक वारकऱ्यांनी व्यक्त केली.

दिंडीतील वारकऱ्यांनीही उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करून आयोजकांचे आभार मानले.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी गुरु माऊली आयुर्वेदिक महाविध्यलाय माळीपरगाव तालुका माजलगाव , आर बी अट्टल महाविद्यालय,गेवराई , जय भवानी महाविद्यालय गढी येथील छडड विध्यार्थी, सार्वजनिक आरोग्य विभाग, जिल्हा परिषद बीड, यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेडचे वैद्यकीय अधिकारी डॉ. चैतन्य कागदे, समन्वयक गणेश गिराम, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ कदम , डॉ पिंगळे, गेवराई तालुका आरोग्य अधिकारी डॉ गोंदीकर अभय ,परळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ मोरे , अशोक लोखंडे यांनी उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले.

वारकऱ्यांच्या आरोग्यसेवेला प्राधान्य देणारा हा उपक्रम सामाजिक बांधिलकीचे प्रभावी उदाहरण ठरला असून भविष्यातही अशा स्वरूपाचे उपक्रम अधिक व्यापक स्तरावर राबविण्याचा मानस आयोजकांनी व्यक्त केला.

## संपादक राजेंद्र होळकर यांना मातृशोक



बीड /प्रतिनिधी

दै. अभिमानचे संपादक राजेंद्र होळकर, संजय होळकर यांच्या मातोश्री द्वारकाबाई बाबुराव होळकर (वय ७६) यांचे वृद्धापकाळाने गुरुवारी सायंकाळी राहत्या घरी निधन झाले.

गेल्या काही महिन्यांपासून त्या आजारी होत्या. उपचारा दरम्यान त्यांची गुरुवारी प्राणज्योत मालवली. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवार दि. १० जुलै रोजी सकाळी ९ वाजता भगवानबाबा प्रतिष्ठाण जवळील स्मशानभूमी, बार्शी रोड, बीड येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात मुले, मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. होळकर परिवारावर कोसळलेल्या दु:खात दैनिक समर्थ राजयोग परिवार सहभागी आहे.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

संपादकीय....

# सहकार, साखर आणि सत्ता समीकरणे

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचा इचलकरंजी दौरा सहकाराच्या चौकटीपलीकडे जात पश्चिम महाराष्ट्रातील बदलत्या राजकीय समीकरणांचा संकेत देणारा ठरला. सहकार, साखर आणि वस्त्रोद्योगाच्या अपेक्षांच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या दौऱ्यातून भाजपने सहकार क्षेत्रातील आपली पकड मजबूत करण्याचा संदेश दिल्याची चर्चा सुरू झाली आहे.

केंद्रीय गृहमंत्री आणि सहकारमंत्री अमित शहा यांचा नुकताच झालेला इचलकरंजी दौरा हा केवळ एका सहकारी बँकेच्या प्रशासकीय इमारतीच्या उद्घाटनापुरता किंवा कारखान्याच्या नामविस्ताराच्या कार्यक्रमापुरता मर्यादित राहिला नाही. दौऱ्यापूर्वी या भेटीकडे सहकार क्षेत्रातील प्रलंबित प्रश्न, साखर उद्योगाच्या अपेक्षा आणि वस्त्रोद्योगाला मिळू शकणाऱ्या संभाव्य दिलाशाच्या पार्श्वभूमीवर पाहिले जात होते. मात्र, कार्यक्रमानंतर शहा यांच्या भाषणातील मुद्दे आणि त्यातून देण्यात आलेल्या राजकीय संदेशामुळे पश्चिम महाराष्ट्रातील आगामी राजकीय समीकरणांबाबत नव्या चर्चांना सुरुवात झाली आहे. इचलकरंजी येथील कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँकेच्या नूतन मुख्यालयाच्या उद्घाटन सोहळ्यानिमित्त राज्यभरातील नागरी सहकारी बँकांचे प्रतिनिधी, साखर कारखान्यांचे पदाधिकारी तसेच भाजपचे नेते एकाच व्यासपीठावर उपस्थित राहिले.

या निमित्ताने शहरी सहकारी बँकांच्या संचालकांच्या कार्यकाळावरील निर्बंध, डिजिटलायझेशन, सायबर सुरक्षा आणि नियामक अडचणी यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर चर्चा होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली होती. मात्र, शाह यांच्या भाषणाचा केंद्रबिंदू केवळ सहकार क्षेत्रापुरता मर्यादित राहिला नाही. सहकार क्षेत्राच्या बळकटीकरणावर भाष्य करतानाच त्यांनी राष्ट्रीय सुरक्षा, घुसखोरी आणि विरोधी पक्षांच्या राजकारणावरही थेट भूमिका मांडली. भारत ही काही धर्मशाळा नाही, असे म्हणत त्यांनी काँग्रेस तसेच उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वावर अधिक तीव्र शब्दांत टीका केली.या वक्तव्याचे राजकीय विश्लेषण करताना एक महत्त्वाची बाब लक्षात घेणे आवश्यक ठरते. पश्चिम महाराष्ट्र हा राज्याच्या राजकारणात नेहमीच प्रभावशाली प्रदेश राहिला असून, विशेषतः सहकार चळवळीचा तो पारंपरिक बालेकिल्ला मानला जातो.

साखर कारखाने, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, नागरी पतसंस्था आणि विविध सहकारी संस्थांच्या माध्यमातून येथील सामाजिक, आर्थिक आणि राजकीय व्यवस्थेची घडी अनेक दशकांपासून बसलेली आहे. या सहकार व्यवस्थेवर दीर्घकाळ राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसशी संबंधित नेत्यांचे वर्चस्व राहिले आहे.

पान १ वरून..

### गेवराई येथे राहत्या...

केली असता तीने सांगितले की, ती जिल्हा नांदेड ची असून, तिला नागरबाई लक्ष्मण हातागळे व घर मालकीण शांताबाई सतीश पवार या महिलेने वेश्याव्यवसाय करण्यासाठी इथे बोलवून घेतले आहे. तसेच अन्य महिलांना बोलावून घेऊन प्रत्येक ग्राहकाकडून १००० रू घेतात व त्यापैकी आम्हाला ५०० रु देतात. अशाप्रकारे आमच्याकडून वेश्या व्यवसाय करुन घेत असल्याचे सांगितले. तसेच रुमची झडती घेतली असता २१ विना वापरलेले निरोध मिळून आले आहे.

नमुद आरोपी हे पीडीत महिलांना. स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी बोलावून घेऊन, स्वतःच्या ताब्यातील जागेचा वापर करुन वेश्याव्यवसाय करण्यास लावले व त्याच कमाईवर स्वतःचा उदरनिर्वाह करत आहे व सदर महिलांचे शोषण करण्याच्या उद्देशाने बोलावले म्हणून त्यांच्या विरुद्ध गेवराई पोलीस ठाण्यात अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ कलम ३.४.५.६. व सह कलम ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच पीडित महिलांची सुटका करण्यात आली आहे.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कावत सर, अप्पर पोलीस अधीक्षक समीर शेख सर यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक निलेश केळे, सहायक पोलीस निरीक्षक जनाबाई सांगळे, सहाय्यक पोलीस उप निरीक्षक मीरा रेडेकर, उषा चौरे, महीला पोलीस हवालदार शोभा जाधव, पोलीस हवालदार अशोक शिंदे. प्रदीप येवले, मपोशी सविता चव्हाण, भाऊसाहेब कारले संदीप गर्जे सर्व नेमणूक व अ. मा. वा. प्र. कक्ष बीड यांनी केली.

### 'ज्ञानराधा'च्या ३९...

साळवे प्रत्यक्ष उपस्थित होते. तर खासदार बजरंग सोनवणे, आमदार विजयसिंह पंडित, आमदार प्रकाश सोळंके, आमदार सुरेश धस, आमदार संदीप क्षीरसागर यांच्यासह संबंधित अधिकारी ऑनलाइन सहभागी झाले.

मुख्यमंत्र्यांनी जप्त करण्यात आलेल्या मालमत्तांचे प्रस्ताव नव्याने तयार करून त्यांचे नामांकित व्यावसायिक संस्थेमार्फत पुनर्मूल्यांकन करण्याचे निर्देश दिले. खासगी क्षेत्रातील निकषांनुसार पारदर्शक आणि अचूक मूल्यांकन झाल्यास मालमत्तेची किंमत वाढून ठेवीदारांना त्यांचे पैसे लवकर मिळण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### सुधारित प्रधानमंत्री...

खरीप हंगामात पेरणीनंतर काढणीपर्यंतच्या कालावधीत नैसर्गिक आपत्ती किंवा प्रतिकूल परिस्थितीमुळे उत्पादनात घट झाल्यास पीक कापणी प्रयोग अथवा तांत्रिक उत्पादन मूल्यांकनाच्या आधारे नुकसानभरपाई दिली जाईल. यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक आधार मिळून शेती व्यवसायातील जोखीम कमी होण्यास मदत होणार आहे.

शासनाने योजनेच्या अंमलबजावणीत पारदर्शकता आणण्यासाठी काही महत्त्वाच्या अटी लागू केल्या आहेत. चुकीची माहिती देऊन अथवा फसवणुकीच्या उद्देशाने विमा घेतल्याचे आढळल्यास संबंधित शेतकऱ्याला पीक विमा योजनेसह कृषी विभागाच्या विविध डीबीटी योजनांपासून पाच वर्षांसाठी अपात्र ठरविण्यात येणार आहे.योजनेसाठी अर्ज करताना जमिनीची कागदपत्रे, पीक लागवड घोषणापत्र, आधार क्रमांक, आधारशी संलग्न बँक खाते तसेच -ऋछखडढ-उघ ऋीशी खऊ आदी कागदपत्रे आवश्यक आहेत.विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयाने सर्व पात्र शेतकऱ्यांना अंतिम मुदतीची वाट न पाहता ३१ जुलैपूर्वीच अर्ज सादर करून सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

### तोहिद खान ....

सय्यद आमेर, सुनील दीक्षित, एजाज सिद्दीकी, सय्यद मुबीन, अब्बुजर मनियार, सय्यद इसाक, पठाण साहिल, सय्यद सबी, पत्रकार सय्यद फय्याज, सय्यद शेरू आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.



बीड /प्रतिनिधी

प्राथमिक शिक्षण विभागाच्या शिक्षणाधिकारी म्हणून श्रीमती जयश्री चव्हाण यांनी बुधवारी पदभार स्वीकारला.तत्पूर्वी त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जतिन रहमान यांची भेट घेतली. यावेळी सीओनी श्रीमती चव्हाण यांचे स्वागत केले.

यापसंगी उपशिक्षणाधिकारी विलास जाधव ,शेख अंजुम व प्रशासनाधिकारी अनंत खेडकर उपस्थित होते.महाराष्ट्र शिक्षण सेवा गट अ मधील अकरा अधिकाऱ्यांच्या नियतकालिक बदल्यांचे आदेश नुकतेच निर्गमित झाले.छत्रपती संभाजीनगर येथील प्राथमिक शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण यांची बीडच्या प्राथमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी पदी नियुक्ती झाली.बीड येथेश्रीमती चव्हाण आज रुजू होताच विविध शैक्षणिक व सामाजिक संघटनेच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आलं.यावेळी महाराष्ट्र राज्य कृतिशील कर्मचारी संघटनेचे राज्य प्रसार प्रमुख तुकाराम पवार यांनी त्यांचे स्वागत केलं.

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-७८३ दि.०६.०७.२०२६**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **अलका विष्णू गाडे रा.लखमापुरी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगाच्या** जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | विकास विष्णू गाडे | मुलगा | ०२.०८.२००७ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ०६/०७/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

# आ. सुरेश धस व प्राजक्ताताई धस यांची बदनामी करणाऱ्या टोळीनं थोडा विचार करावा-माऊली जरांगे



पाटोदा । महाराष्ट्रात पहिल्यांदा दूध भेसळीवर आवाज आमदार सुरेश धस यांनी उठवला आ. धस यांचा राजकीय प्रवास दूध संघापासून सुरू झालेला आहे. आणि शेतकऱ्याच्या हिताचे निर्णय घेण्यासाठी धस हे नेहमी आग्रेसर असतात. आष्टी तालुक्यात शेतकऱ्यांचा दूध धंदा टिकून राहिला पाहिजे आणि त्या दुध धंद्यातुन शेतकऱ्यांना चांगले दिवस येण्यासाठी धस नेहमी प्रयत्नशील असतात नुसते प्रयत्नशील नाही तर भेसळी च्या

विरोधामध्ये महाराष्ट्रातील काही जिल्ह्यात त्यांनी अनेकदा कारवाई करण्यासंदर्भात प्रयत्न केलेले आहेत सभागृहामध्ये पोट तिडकेने भेसळी विरोधामध्ये विषय मांडून सभागृहाचे व शासनाचे लक्ष वेधण्याचे काम अनेकदा धस यांनी केलेले आहे.आ सुरेश धस व प्राजक्ताताई धस यांची बदनामी करणाऱ्या टोळीनं थोडा विचार करावा असे माऊली जरांगे यांनी सांगितले आहे. आ. सुरेश धस याच्या विरोधामध्ये काही लोकांची टोळी बदनामी करण्यासाठी सतत सक्रिय आहे. या अधिवेशनामध्ये आमदार सुरेश धस यांनी मा. तुकाराम मुंडे साहेबांचे कौतुक करत दूध भेसळीच्या विरोधामध्ये मकोका अंतर्गत कारवाई करण्याची मागणी केली आणि या टोळीने काल परवा बीड जिल्ह्यातील एका बड्या नेत्याची पत्नी पावडर प्लांट वाल्याला धमकावत आहे अशी बिन बुडाची बदनामी करणारी बातमी प्रसिद्ध करून समाजाचे लक्ष विचलित करून बदनामी करण्याचा केविलवाणा जो प्रयत्न केला आहे. त्यांना जनाची नाही पण मनाची थोडी तरी एक असेल तर त्यांनी त्यांचा दूध धंद्यातील असणारा अनुभव व दूध धंद्यामध्ये त्यांची चाललेली तळमळ या सगळ्या गोष्टीचा विचार करून बदनामी करणे योग्य आहे परंतु या गोष्टीवर विचार न करता फक्त बदनामी करून समाजाला संभ्रमात टाकून कशा पद्धतीने या परिवाराची मानहानी होईल हा केविलवाणा प्रयत्न ज्यांनी कोणी केला त्यांना एवढंच सांगणं आहे की आपण बदनामीचा विडा उचलला आहे परंतु बदनामी करत असताना तुमच्या शब्दाला व तुमच्यातील त्या भूमिकेला समाजामध्ये मान्यता मिळणार नाही याचे मुख्य कारण असं आहे की आष्टी तालुका दुध संघ आ. सुरेश धस यांच्या नेतृत्वाखाली काम करत आहे तो संघ अनेक वर्षापासून सक्रिय आहे आणि तो कॉलिटी मेंटन करणारा संघ म्हणून राज्यात प्रसिद्ध आहे आ. सुरेश धस व त्यांच्या पत्नी प्राजक्ता ताई धस यांच्या विरोधात कितीही अफवा तुम्ही पसरवल्या तरी समाजाला चांगलं माहित आहे. दुधाच्या बाबतीमध्ये हे किती प्रामाणिक काम करत आहेत. अफवा पसरवणाऱ्याचा आम्ही जाहीर निषेध करतो असे माऊली जरांगे यांनी पत्रकात म्हटले आहे .

---

**जाहीर प्रगटन पेपर**
**मा. के. सी. माने ३रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात, बीड, ता.जि. बीड**
**किरकोळ दिवाणी अर्ज कमांक ९८९/२०२६**
**सीएनआर क्रमांक एमएचबीआय०२०००१७८८२०२६**
**माधुरी माधवराव देशमुख व ईतर वि. निरंक**
**(मार्फत ॲड. व्ही. पी. जोशी)**

अर्जदार :-

१. माधुरी भ्र. माधवराव देशमुख वय-६३ वर्षे, धंदा-घरकाम, रा. दत्त मंदिर गल्ली, सुभाष रोड बीड ता. जि. बीड

२. मंजुश्री भ्र. गजानन मुळे, वय-४१ वर्षे, धंदा-घरकाम, रा. जुना बाजार, देशमुख गल्ली, बीड ता. जि. बीड

३. महेश पि. माधवराव देशमुख, वय-४३ वर्षे, धंदा-मजुरी रा. दत्त मंदिर गल्ली, सुभाष रोड बीड ता. जि. बीड

४. मुकेशकुमार पि. माधवराव देशमुख, वय-३८ वर्षे, धंदा-नौकरी, रा. दत्त मंदिर गल्ली, सुभाष रोड बीड ता. जि. बीड

विरुध्द

निरंक

मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणुन मिळणे बाबत.

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात माधव पि. भगवान देशमुख यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत माधव पि. भगवान देशमुख यांचा मृत्यु दिनांक २१/०५/२०१७ रोजी झाला. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क. २ ही मयताची मुलगी व अर्जदार क. ३ व ४ हे मयताचे मुले आहेत. वरील अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत.

मयत माधव पि. भगवान देशमुख यांचे मृत्युनंतर वरील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीत व ईतर कार्यालयीन उपयोगा करीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवावी. जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयतांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वानी नोंद घ्यावी.

प्रकरणातील पुढील तारीख ०४/०८/२०२६

आज दिनांक ०२ माहे जुलै २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**आदेशावरुन,**
**स्वाक्षरित/-**
**क. लिपीक** — **अधिक्षक**
**दिवाणी न्यायालयीन स्तर बीड**

---

## टी.सी. हरवला आहे

आतार आलिशा जिलानी, वय २१ वर्षे, धंदा- शिक्षण, रा.इस्लामपुरा, बीड, या नावाचा इयत्ता ११ वी पास टी.सी. हा बीड बसस्थानक परिसरात हरवला आहे.

सापडल्यास संपर्क -७०३०१ ४९३२२

---

## उत्तीर्ण प्रमाणपत्र हरवले आहे

शेख शकीला जिलानी कै.हरीबाई वरपुडकर कनिष्ठ महाविद्यालय पेडगाव ता.जि.परभणी उच्च माध्यमिक इयत्ता १२ वी उत्तीर्ण प्रमाणपत्र परिक्षा क्र.ठज३९८३३ ने उत्तीर्ण झाली. या नावाची उत्तीर्ण प्रमाणपत्र जालना ते परभणी प्रवासा दरम्यान हरवली आहे.

कोणासही सापडल्यास या मोबाईल नंबर- ९०७५७६७२८४ वर संपर्क साधावा.

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ४५७/२०२६**
**सावित्राबाई ब्र. गुलाब शिंदे आणि इतर वि. निरंक**
**मार्फत - ए.एम. सुतार गेवराई**

अर्जदार -१. सावित्राबाई भ्र. गुलाब शिंदे
वय ७५ वर्षे, धंदा घरकाम
रा. मोहितेचीवाडी / बुधनगरवाडी पो. मादळमोही ता. गेवराई जि. बीड
२. सखाराम पि. गुलाब शिंदे
वय ४८ वर्षे, धंदा - मजुरी
रा. सदर ह.मु. कलाटे नगर दत्त मंदीरजवळ पुणे शहर ता. जि. पुणे
३. सुरेश पि. गुलाब शिंदे
वय ३३ वर्षे, धंदा - मजुरी
रा. सदर ह.मु. साई सागर कॉलनी, रहाटनी काळेवाडी पुणे
४. अनिता भ्र. तान्हाजी साळवे
वय ४४ वर्षे, धंदा - घरकाम
रा. सदर
५. रंजना भ्र. बन्डू उर्फ राम पउळ
वय ४० वर्षे, धंदा - घरकाम
रा. खापरपांगरी बीड ता. जि. बीड
६. कांचन भ्र. बाबा तुपे
वय ३५ वर्षे, धंदा - घरकाम.
रा. प्रकाशनगर नगर रोड पुणे
७. ज्योती बी. आर. किशोर कुचेकर
वय ३८ वर्षे, धंदा - घरकाम
रा. प्रेरणा शाळेजवळ, लक्ष्मण नगर, थेरगाव, पुणे शहर.

ज्याअर्थी मयत गुलाब मारोती शिंदे रा. मादळमोही ता. गेवराई जि. बीड हे/हया अनुक्रमे दिनांक २९/०५/२०१८ रोजी रा. साई नगर कॉलनी, रहाटनी पिंपरी चिंचवड हवेली पुणे जि. पुणे येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत गुलाब मारोती शिंदे रा. मादळमोही ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०३/०७/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख: १७/०८/२०२६

स्वाक्षरित/- **कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई — शिक्का — आदेशावरून स्वाक्षरित/- **सहाय्यक अधिक्षक** दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ४०३/२०२६**
**किसन पि. मुन्ना राठोड वि. निरंक**
**मार्फत ॲड. ए बी बांगर गेवराई**

अर्जदार १. किसन पि. मुन्ना राठोड वय ३८ वर्षे, धंदा - शेती, रा. केकतपांगरी, ता. गेवराई जि. बीड

ज्याअर्थी मयत मुन्ना रूपला राठोड, रा. केकतपांगरी, ता. गेवराई जि. बीड हे/हया अनुक्रमे दिनांक १९/११/२०१९ रोजी रा. केकतपांगरी ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत मुन्ना रूपला राठोड, रा. केकतपांगरी, ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १९/०६/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख:- ०४/०८/२०२६

स्वाक्षरित/- **कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई — शिक्का — आदेशावरून स्वाक्षरित/- **सहाय्यक अधिक्षक** दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ४०९/२०२६**
**भाउसाहेब पि. बप्पासाहेब घुगे वि. निरंक**
**मार्फत - ॲड. ए बी बांगर गेवराई**

अर्जदार १. भाउसाहेब पि. बप्पासाहेब घुगे
वय ४९ वर्षे, धंदा - शेती,
रा.सिरसमार्ग ता. गेवराई जि. बीड

ज्याअर्थी मयत १. बप्पासाहेब पि. लक्ष्मण घुगे, २. गयाबाई भ्र. बप्पासाहेब घुगे दोन्ही रा. सिरसमार्ग ता. गेवराई जि. बीड हे/हया अनुक्रमे १. दिनांक २६/०४/२०२१ २. दिनांक ०३/०२/२०२६ रोजी दोन्ही रा. सिरसमार्ग ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत १. बप्पासाहेब पि. लक्ष्मण घुगे, २. गयाबाई भ्र. बप्पासाहेब घुगे दोन्ही रा. सिरसमार्ग ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २३/०६/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख:- ०५/०८/२०२६

स्वाक्षरित/- **कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई — शिक्का — आदेशावरून स्वाक्षरित/- **सहाय्यक अधिक्षक** दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

**दिवाणी न्यायालय, घनसावंगी येथील**
**श्री सी. एस. जगताप, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, घनसावंगी यांचे न्यायालयात.**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ८१/२०२६**
**नर्मदाबाई -वि.- निरंक**

अर्जदार:
१. नर्मदाबाई भ्र.रामदयाल जाजू, वय ७० वर्ष, धंदा शेती
२. पुरुषोत्तम पि.रामदयाल जाजू, वय ४६ वर्ष,धंदा शेती
३. अनिल पि.रामदयाल जाजू, वय ३२ वर्ष, धंदा शेती
४. उज्वला भ्र.संतोष सारडा वय ५६ वर्ष, धंदा शेती
५. दुर्गा भ्र.जयप्रकाश तोष्णीवाल वय ४८ वर्ष, धंदा शेती अर्जदार क्र. १ ते ३ रा. बोडखा ता. घनसावंगी जि.जालना अर्जदार क्र.४ रा. कबड गल्ली, बीड ता. बीड जि.बीड अर्जदार क्र.५ रा. मेन रोड, क्रांती चौक, धारुर ता.धारुर जि. बीड

विरुध्द -निरंक

जाहीर प्रगटन

अर्ज - कलम ३ व ७ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबत.

अर्जदार यांनी ॲड.बी.एस.येडेकर यांच्या मार्फत या न्यायालयात असा अर्ज केला की, अर्जदार क्र.१ ते ५ यांचे वडील नामे रामदयाल चुन्नीलाल जाजु यांचा मृत्यू दिनांक २८/०५/२०२३ रोजी मौजे बोडखा ता. घनसावंगी जि. जालना येथे झाला आहे.

हे की, रामदयाल चुन्नीलाल जाजु यांना अर्जदारांशिवाय ईतर अन्य कुठलेही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामकाजासाठी मयताचे वारस म्हणून वारस प्रमाणपत्राची नितांत आवश्यकता आहे.

करीता या जाहीर प्रगटनाद्वारे सर्वत्र कळविण्यात येते की, या बाबत जर कोणास काहीएक आक्षेप असेल तर त्यांनी सदरचे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात आपला आक्षेप सादर करावा. जर नमूद केलेल्या काळात कोणाचाही आक्षेप आला नाही, तर संबंधित प्रकरणात कायद्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही केली जाईल, याची नोंद घ्यावी. सदर प्रकरणात पुढील तारीख १७/०८/२०२६ ठेवण्यात आली आहे.

आज दिनांक ०९/०७/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले आहे.

क.लिपीक **(एस.एस.देशमुख)** — शिक्का — आदेशान्वये, **(एस.व्ही. चाटुफळे)** सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर, घनसावंगी.

---

**दिवाणी न्यायालय, घनसावंगी येथील**
**श्री सी. एस. जगताप, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, घनसावंगी यांचे न्यायालयात.**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ८३/२०२६**
**विमल व इतर - वि.- निरंक**

अर्जदार १. विमल भ्र.श्रीराम कुटे, वय ६५ वर्ष, धंदा घरकाम
रा.आय.आय.टी.मार्केट, एस.११२,
महात्मा ज्योतिबा फुलेनगर, के.व्ही. वाघ मार्ग पवई मुंबई
२. आशा राजू मुख्यदल, वय ५५ वर्ष, धंदा घरकाम
रा.आय.आय.टी.मार्केट, सिध्दार्थ कामटी चौळ, रुम नं.७७,
महात्मा ज्योतिबा फुलेनगर, मुंबई

विरुध्द -निरंक

जाहीर प्रगटन

अर्ज - कलम ३ व ७ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबत.

अर्जदार यांनी ॲड..आर.एस.देशमुख यांच्या मार्फत या न्यायालयात असा अर्ज केला की, अर्जदार यांचे वडील नामे हरीभाउ पि. तुकाराम गायकवाड यांचा मृत्यू दिनांक १६/०२/२००७ रोजी मौजे मुंबई येथे झाला आहे. मयताची पत्नी प्रयागबाई हरीभाउ गायकवाड हया देखिल मयत झालेल्या आहेत.

हे की, हरीभाउ पि. तुकाराम गायकवाड यांना अर्जदारांशिवाय ईतर अन्य कुठलेही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामकाजासाठी मयताचे वारस म्हणून वारस प्रमाणपत्राची नितांत आवश्यकता आहे.

करीता या जाहीर प्रगटनाद्वारे सर्वत्र कळविण्यात येते की, या बाबत जर कोणास काहीएक आक्षेप असेल तर त्यांनी सदरचे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात आपला आक्षेप सादर करावा. जर नमूद केलेल्या काळात कोणाचाही आक्षेप आला नाही, तर संबंधित प्रकरणात कायद्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही केली जाईल, याची नोंद घ्यावी. सदर प्रकरणात पुढील तारीख १७/०८/२०२६ ठेवण्यात आली आहे.

आज दिनांक ०९/०७/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले आहे.

क.लिपीक **(एस.एस.देशमुख)** — शिक्का — आदेशान्वये, **(एस.व्ही. चाटुफळे)** सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर, घनसावंगी.

---

**जाहीर प्रगटन**
**ॲड.एम.एम.जोशी**
**मा. श्री. प्रविण आर. शिंदे दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, बीड यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १०७०/२०२६**
**विश्वंबर पि.सोपानराव लाळगे व इतर वि. निरंक**

अर्जदार
१. विश्वंबर पि. सोपानराव लाळगे, वय - ६३ वर्षे, धंदा-शेती, रा. खापर पांगरी, ता.जि.बीड
२. तुलसीराम पि. सोपानराव लाळगे, वय-५४ वर्षे, धंदा-शेती, रा.सदर
३. परमेश्वर पि. सोपानराव लाळगे, वय-५१ वर्षे, धंदा-शेती, रा.सदर

विरुध्द

गैर-अर्जदार -निरंक

प्रकरण:-बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत तुळसाबाई विश्वनाथ ढोरमारे यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत मयत तुळसाबाई विश्वनाथ ढोरमारे हया दिनांक ०६/०८/१९६५ रोजी खापर पांगरी ता. जि. बीड येथे मयत झालेल्या आहेत. अर्जदार क. १ ते ३ हे मयताचे नातू म्हणजे मुलीचे मुले आहेत. मयतास एकुलती एक मुलगी नामे आसराबाई सोपान लाळगे ही होती, ती दिनांक ०३/०७/२००१ रोजी मयत झालेल्या आहेत. तसेच आसराबाईचे पती व अर्जदारांचे वडील सोपान पांडु लाळगे हे दिनांक ०२/०४/१९७१ रोजी मयत झालेले आहेत. मयताचे पती हे फार वर्षापूर्वीच मयत झालेले आहेत. अर्जदारांशिवाय मयतास ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणुन सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहु मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसाच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु, मयत नामे मयत तुळसाबाई विश्वनाथ ढोरमारे रा. खापर पांगरी ता. जि. बीड यांचे अर्जदार हे कायदेशीर वारस म्हणुन घोषीत करुन अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पुढील तारीख २४/०८/२०२६.

आज दिनांक ०९/०७/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

**स्वाक्षरित/-** **क.लिपीक** — शिक्का — आदेशान्वये, **स्वाक्षरित/-** अधीक्षक दिवाणी न्या.व.स्तर,बीड

# राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक-कलाकार सन्मान योजना ज्येष्ठ कलावंतांना सन्मानाने जगण्याचा आधार

## सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत १ ते ३१ जुलै दरम्यान ऑनलाइन अर्ज प्रक्रिया; पात्र ज्येष्ठ साहित्यिक व कलाकारांना दरमहा ५ हजार रुपये मानधन

मुंबई /प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या 'राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक-कलाकार सन्मान योजना' अंतर्गत कला व साहित्य क्षेत्रात दीर्घकाळ उल्लेखनीय योगदान देणाऱ्या १०० ज्येष्ठ साहित्यिक व कलाकारांना दरमहा ५,००० रुपये मानधन प्रदान करण्यात येणार आहे. या योजनेसाठी पात्र लाभार्थ्यांनी दि. १ ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत 'आपले सरकार' पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करावेत, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत करण्यात आले आहे.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी सामाजिक न्याय, समता आणि सर्वसमावेशक विकासाची दिलेली प्रेरणा जपत, आयुष्यभर कला आणि साहित्य क्षेत्रासाठी योगदान देणाऱ्या ज्येष्ठ कलावंतांना आर्थिक आधार व सन्मान मिळावा, या उद्देशाने ही योजना राबविण्यात येत आहे. सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ज्येष्ठ साहित्यिक व कलाकारांच्या योगदानाचा गौरव करून त्यांना सन्मानपूर्वक जीवन जगण्यास सहाय्य करणे, हा या योजनेमागील प्रमुख हेतू आहे.

या योजनेसाठी अर्जदाराचे वय ५० वर्षांपेक्षा अधिक असणे आवश्यक असून दिव्यांग कलाकारांसाठी वयोमर्यादेत १० वर्षांची शिथिलता देण्यात आली आहे. त्यामुळे दिव्यांग अर्जदारांसाठी किमान वय ४० वर्षे निश्चित करण्यात आले आहे. अर्जदाराचे कला अथवा साहित्य क्षेत्रातील किमान १५ वर्षांचे योगदान आवश्यक असून वयाने ज्येष्ठ असलेले विधवा, परित्यक्ता आणि दिव्यांग कलाकारांना प्राधान्य देण्यात येणार आहे.

योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न ६० हजार रुपयांपेक्षा अधिक नसावे. तसेच ज्यांची उपजीविका प्रामुख्याने कलेवर अवलंबून असून अन्य कोणतेही उत्पन्नाचे साधन उपलब्ध नाही, अशाच पात्र कलाकारांना या योजनेचा लाभ देण्यात येणार आहे. केंद्र किंवा राज्य शासनाच्या कोणत्याही नियमित मासिक पेन्शन अथवा महामंडळाच्या निवृत्तीवेतनाचा लाभ घेणारे अर्जदार या योजनेसाठी अपात्र राहतील. अर्जदार हा महाराष्ट्राचा रहिवासी असणे बंधनकारक आहे.

ऑनलाइन अर्ज भरताना वयाचा दाखला, आधार कार्ड, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी दाखला, प्रतिज्ञापत्र, पती-पत्नीचे संयुक्त छायाचित्र (लागू असल्यास), बँक पासबुक, अपंगत्व प्रमाणपत्र (लागू असल्यास), राज्य अथवा केंद्र शासनाचे संबंधित प्रमाणपत्र (लागू असल्यास), नामांकित संस्था किंवा व्यक्तींचे शिफारसपत्र (लागू असल्यास) तसेच आवश्यक इतर कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे.

सदर योजना मा. ड. आशिष शेलार, मंत्री (सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विकास), महाराष्ट्र राज्य यांच्या संकल्पनेतून तसेच मा. डॉ. किरण कुलकर्णी, सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. राज्यातील ज्येष्ठ साहित्यिक आणि कलाकारांच्या कलासाधनेचा सन्मान करून त्यांना सामाजिक व आर्थिक बळ देण्यासाठी सांस्कृतिक कार्य विभाग सातत्याने विविध कल्याणकारी उपक्रम राबवत आहे.

पात्र ज्येष्ठ साहित्यिक व कलाकारांनी अर्जाची अंतिम मुदत लक्षात घेऊन दि. ३१ जुलै २०२६ पूर्वी 'आपले सरकार' पोर्टलवर ऑनलाइन अर्ज सादर करून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्रीराम पांडे, संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी केले आहे.

# पाटोदा-नायगावच्या भूमिपुत्राची वैद्यकीय क्षेत्रात मोठी भरारी

किर्गिज़स्तानमधून डॉ. आहाद मजीद शेख यांनी एमबीबीएस पदवी संपादन

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील नायगाव येथील भूमिपुत्र तथा सध्या बालेपीर, बीड येथे वास्तव्यास असलेले डॉ. आहाद मजीद शेख यांनी किर्गिज़स्तान या देशातून वैद्यकीय क्षेत्रातील प्रतिष्ठेची एमबीबीएस (चइइड) पदवी यशस्वीरित्या संपादन करून आपल्या कुटुंबासह तालुक्याचे नाव उज्ज्वल केले आहे.

त्यांच्या या उल्लेखनीय यशानिमित्त वडील जिल्हा विस्तार अधिकारी शेख माजीद यांच्या बालेपीर, बीड येथील निवासस्थानी कुटुंबीय, नातेवाईक व मित्रपरिवाराच्या उपस्थितीत डॉ. आहाद शेख यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच त्यांच्या उज्ज्वल वैद्यकीय कारकिर्दीसाठी शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला.



यावेळी अब्दुल कादर (जमाते आमिर, नायगाव), शेख जफर, शेख अजीम, शेख साजीद, पत्रकार हमीदखान पठाण, शेख अजीम सर, शेख अनस आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ. आहाद शेख यांच्या यशाबद्दल नायगाव परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या पुढील वैद्यकीय सेवेसाठी सर्व स्तरांतून शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

# प्रगती हवी... पण निसर्गाचा विनाश नको.!

## निसर्गावर विजय मिळवण्याचा प्रयत्न करणारा माणूस शेवटी निसर्गासमोरच हतबल होतो..?

पिंपरी पुणे - पाऊस हा जीवनाचा आधार आहे. तो शेतीला, नद्यांना, जंगलांना आणि संपूर्ण सृष्टीला नवजीवन देतो. परंतु जेव्हा तो रौद्ररूप धारण करतो, तेव्हा तो आशीर्वाद न राहता संकट बनतो. रस्त्यावर पाणीच पाणी साचते, घरांमध्ये पाणी शिरते, वीजपुरवठा खंडित होतो, मोबाईल नेटवर्क आणि इंटरनेट सेवा बंद पडतात, वाहतूक विस्कळीत होते, रस्ते बंद होतात, शाळा-महाविद्यालये बंद राहतात आणि दैनंदिन जीवन पूर्णपणे ठप्प होते. काही ठिकाणी वीजेचा धक्का लागून निष्पाप नागरिकांचा मृत्यू होतो. रुग्णवाहिका अडकतात, रुग्णांना वेळेवर उपचार मिळत नाहीत आणि प्रत्येकजण असहाय्य बनतो.

अतिवृष्टीमुळे पूर येतात. काही तासांच्या मुसळधार पावसात आयुष्यभराची कमाई वाहून जाते. अनेकांची घरे कोसळतात किंवा पुराच्या पाण्यात वाहून जातात. शेतीचे प्रचंड नुकसान होते. जनावरे वाहून जातात. लहान मुले, वृद्ध आणि आजारी व्यक्ती मोठ्या संकटात सापडतात. हजारो कुटुंबे बेघर होतात. रोगराई पसरते, पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होते आणि सर्वत्र भीती व हतबलतेचे वातावरण तयार होते.

प्रश्न असा आहे की, या परिस्थितीसाठी केवळ निसर्गच जबाबदार आहे का.?

उत्तर स्पष्ट आहे नाही.

विकासाच्या नावाखाली आपण निसर्गाचा समतोल मोठ्या प्रमाणावर बिघडवला आहे. काँक्रीटच्या रस्त्यांनी आणि इमारतींनी पावसाचे पाणी जमिनीत मुरण्याचे नैसर्गिक मार्ग बंद केले. मोकळी मैदाने, शेतजमिनी आणि पाणथळ जागा नाहीशा झाल्या. नद्या, ओढे आणि नाल्यांची पात्रे अरुंद करण्यात आली. त्यांच्यावर अतिक्रमणे झाली. डोंगर फोडले गेले. जंगलांचा ऱ्हास झाला. मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड झाली. नियोजनाशिवाय शहरीकरण वाढले. परिणामी, पाण्याचा नैसर्गिक प्रवाह अडला आणि प्रत्येक मुसळधार पावसात शहरे पाण्याखाली जाऊ लागली.

इतकेच नव्हे, तर अनेक उद्योगधंद्यांतून प्रक्रिया न केलेले रासायनिक सांडपाणी नद्या, ओढे आणि तलावांमध्ये सोडले जाते. त्यामुळे पाण्याचे प्रदूषण वाढते, जलचरांचा मृत्यू होतो, शेतीवर परिणाम होतो आणि मानवी आरोग्य धोक्यात येते. नद्या या केवळ पाण्याचे स्रोत नसून संपूर्ण जीवनव्यवस्थेचा आधार आहेत. त्यामुळे जलप्रदूषण रोखणे ही काळाची गरज आहे.

आज माणूस तंत्रज्ञानात प्रचंड प्रगती करत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, उपग्रह, आधुनिक वाहतूक, वेगवान इंटरनेट, उंच इमारती आणि अत्याधुनिक यंत्रणा यांचा आपल्याला अभिमान आहे. पण एका मुसळधार पावसाने वीज, इंटरनेट, मोबाईल नेटवर्क, वाहतूक आणि दळणवळण व्यवस्था काही तासांत ठप्प होते. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते तंत्रज्ञान निसर्गावर राज्य करू शकत नाही. निसर्गाशी सुसंगत विकासच टिकाऊ असतो.

आज हवामान बदल हा संपूर्ण जगासमोर उभा असलेला गंभीर प्रश्न आहे. वाढते प्रदूषण, हरितगृह वायूंचे उत्सर्जन, जंगलतोड आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचा अतिवापर यामुळे पृथ्वीचे तापमान वाढत आहे. परिणामी, कमी दिवसांत अतिवृष्टी, दीर्घकाळ दुष्काळ, उष्णतेच्या लाटा, चक्रीवादळे आणि अनियमित हवामानाच्या घटना वाढत आहेत.

परंतु केवळ सरकारला दोष देऊन चालणार नाही. नागरिक म्हणून आपलीही तितकीच जबाबदारी आहे. आपण प्लास्टिक आणि कचरा नाल्यांमध्ये टाकतो.



लेखिका
**प्रा दिपाली नारायण बागनाईक,**
प्राध्यापिका,
डॉ.डी. वाय. पाटील आर्ट्स,कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालय,पिंपरी पुणे १८

त्यामुळे पावसाचे पाणी वाहून जाण्याचे मार्ग बंद होतात. सार्वजनिक ठिकाणी घाण करणे, नदीपात्रात कचरा टाकणे आणि पर्यावरणाकडे दुर्लक्ष करणे या सवयी आपण बदलल्या पाहिजेत.

प्रशासनानेही पावसाळ्यापूर्वी नालेसफाई, नदीपात्रांची स्वच्छता, अतिक्रमण हटवणे, दर्जेदार जलनिस्सारण व्यवस्था, पर्यावरणपूरक नगररचना आणि नियोजनबद्ध विकास यांना प्राधान्य दिले पाहिजे. विकास करताना पर्यावरणाचा विचार करणे ही चैनीची गोष्ट नसून काळाची गरज आहे.

प्रत्येक घर, सोसायटी, शाळा, महाविद्यालय, उद्योग आणि सरकारी कार्यालयात पर्जन्यजल संधारण (ठरळप-रींशी क्रींीशिीळपस) प्रभावीपणे राबवले गेले पाहिजे. पावसाचे पाणी जमिनीत मुरल्यास भूजल वाढेल, पाण्याची टंचाई कमी होईल आणि पूराचा धोका कमी होईल.

नद्या, तलाव, विहिरी, ओढे आणि जलाशय हे निसर्गाचे प्राण आहेत. त्यांचे संवर्धन करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. त्यांच्यावर अतिक्रमण करणे, त्यात कचरा किंवा रासायनिक सांडपाणी सोडणे म्हणजे स्वतःच्या भविष्याशी खेळणे होय.

सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, जेवढी वृक्षतोड केली जाते त्याच्या दुप्पट-तिप्पट वृक्षलागवड करणे ही प्रत्येकाची नैतिक जबाबदारी आहे. झाडे केवळ ऑक्सिजन देत नाहीत; ती पावसाचे संतुलन राखतात, भूजल वाढवतात, मातीची धूप रोखतात, तापमान नियंत्रित ठेवतात आणि असंख्य पक्षी, प्राणी व सजीवांना आश्रय देतात. झाडे तोडून विकास साधणे म्हणजे भविष्यातील संकटांना आमंत्रण देणे होय.

निसर्गात अनावश्यक हस्तक्षेप करू नका. नद्यांची पात्रे अरुंद करू नका. डोंगर फोडू नका. जंगलांचा विनाश करू नका. प्रत्येक विकासकामापूर्वी पर्यावरणाचा सखोल विचार करा. कारण निसर्गाचे नियम बदलण्याचा प्रयत्न केला, तर त्याची किंमत पूर, भूस्खलन, दुष्काळ, उष्णतेच्या लाटा, जलटंचाई आणि इतर नैसर्गिक आपत्तींच्या रूपाने संपूर्ण मानवजातीला चुकवावी लागेल.

आपत्ती आल्यावर मदत करणे महत्त्वाचे आहे; पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे आपत्ती टाळण्यासाठी प्रयत्न करणे. हवामान विभागाच्या इशाऱ्यांचे पालन करणे, पुरग्रस्त भागातून वेळेवर स्थलांतर करणे, विद्युत सुरक्षेचे नियम पाळणे आणि पर्यावरणाबाबत जागरूक राहणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे.

प्रगती म्हणजे केवळ उंच इमारती, रुंद रस्ते आणि आधुनिक तंत्रज्ञान नव्हे. खरी प्रगती तीच, जी माणूस आणि निसर्ग यांच्यातील समतोल जपते. विकास नक्की करा; पण तो निसर्गाला सोबत घेऊन करा. झाडे लावणे हा खर्च नाही, तर पुढील पिढ्यांसाठी केलेली अमूल्य गुंतवणूक आहे.

आपण पृथ्वी आपल्या पूर्वजांकडून वारसा म्हणून मिळवलेली नाही; ती आपण आपल्या पुढील पिढ्यांकडून उधार घेतलेली आहे. त्यामुळे ती अधिक सुंदर, सुरक्षित आणि समृद्ध करून त्यांच्याकडे सुपूर्द करणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे.

निसर्गाचा आदर करा. पर्यावरणाचे रक्षण करा. विकास करा, पण विवेकाने करा.

कारण निसर्ग जगला तरच माणूस जगेल.

जेवढी वृक्षतोड, त्याच्या दुप्पट-तिप्पट वृक्षलागवड हाच खऱ्या विकासाचा मंत्र.

प्रगती हवी... पण निसर्गाचा विनाश नको!

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-५३३ दि.१०.०६.२०२६**

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **भिकाजी सखाराम पाळीक, रा.महाकाळा ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **नात**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | आरती अर्जुन पाळीक | नात | ०४.०९.२०१४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- १०/०६/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-५३० दि.१०.०६.२०२६**

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **छाया पि.भिकाजी पाळीक रा.महाकाळा ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | छाया पि.भिकाजी पाळीक | नात | १२.०१.१९८२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- १०/०६/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-५३४ दि.१०.०६.२०२६**

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **भिकाजी सखाराम पाळीक रा.महाकाळा ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | आर्यन अर्जुन पाळीक | नातु | २९.०६.२०१८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- १०/०६/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-८३१ दि.०८.०७.२०२६**

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **योगीराज अनिल जाधव, रा.गोविंदपुर ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **वडील** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अनिल लिंबाजी जाधव | वडील | ०६.०६.२०१६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ०८/०७/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ४६०/२०२६**
**मिठुलाल पि. रामनाथ पालवे व इतर वि. निरंक**
**मार्फत - ॲड एस एस काळे गेवराई**

अर्जदार
१. मिठुलाल पि. रामनाथ पालवे
वय ४९ वर्षे, धंदा - शेती रा. सावरगाव पोखरी ता. गेवराई जि. बीड
२. मंदा भ्र. आत्माराम बटुळे
वय ४० वर्षे, धंदा - घरकाम रा. भारजवाडी ता. पाथर्डी जि. अहमदनगर.

ज्याअर्थी मयत मुक्ताबाई भ्र. रामनाथ पालवे रा. सावरगाव पोखरी ता. गेवराई जि. बीड हे/हया अनुक्रमे दिनांक ०२/०३/२०१९ रोजी रा. सावरगाव पोखरी ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत मुक्ताबाई भ्र. रामनाथ पालवे रा. सावरगाव पोखरी ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०६/०७/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीखः- १७/०८/२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

**शिक्का**

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**श्री. रविंद्र अ. मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई**
**जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ४५८/२०२६**
**गजराबाई भ्र. अर्जुन सदाफुले व इतर वि. निरंक**
**(मार्फत - ॲड. आर.एल. मस्के, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे अर्जुन पि. नामदेव सदाफुले, रा. संगमजळगाव ता. गेवराई जि. बीड हे/हया दिनांक ३०/०८/२००६ रोजी राजवाडी हॉस्पीटल मुंबई ता. जि. मुंबई येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार क्र. १ गजराबाई भ्र. अर्जुन सदाफुले, वय ६८ वर्षे, धंदा घरकाम, रा. संगमजळगाव ता. गेवराई जि.बीड ह.मु. मुंबई ता. जि. मुंबई, अर्जदार क्र. २ संजय पि. अर्जुन सदाफुले, वय ४२ वर्षे, धंदा शेती व नोकरी, रा. संगमजळगाव ता. गेवराई जि.बीड ह.मु. मुंबई ता. जि. मुंबई, अर्जदार क्र. ३ सतिष अर्जुन सदाफुले, वय ३४ वर्षे, धंदा शेती व नोकरी, रा. संगमजळगाव ता. गेवराई जि.बीड ह.मु. मुंबई ता. जि. मुंबई यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत अर्जुन नामदेव सदाफुले यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०३/०७/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

पुढील तारीख - १८/०८/२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

**शिक्का**

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्रीमती. एस एच पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांकः ४४४/२०२६**
**महादेव विर- निरंक**
**(मार्फत ॲड. पी. पी. जरांगे )**

ज्याअर्थी मयत नामे बाबासाहेब पि. तात्याबा विर हे दि. १७.१०.२०२४ हे रोजी मौजे उमापूर, ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले आहेत.

अर्जदार
१. महादेव पि. बाबासाहेब विर
वय ४७ वर्षे धंदा - शेती रा. उमापूर ता. गेवराई जि. बीड

शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे. त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे बाबासाहेब पि. तात्याबा विर हे दि. १७.१०.२०२४ रोजी येथे मयत झाले असून ते मौजे रा. उमापूर ता. गेवराई जि. बीड येथील रहिवासी असून यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले

पुढील तारीख : १३.०८.२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

**शिक्का**

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

**जाहीरनामा**
**वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत**
**श्रीमती एम.एस.कुलकर्णी दिवाणी न्यायाधिश क.स्तर, केज, यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज कमांक २६३/२०२६**
**नि.क.८/ड**
**दीपक विरुध्द निरंक**

ज्यापेक्षा मयत १. अंबादास दगड्डु पटेकर उर्फ पाटेकर रा. कुंबेफळ ता. केज. जि. बीड हे दिनांक २९ माहे ०८ सन २०२२ रोजी व २. भागाबाई अंबादास पटेकर उर्फ पाटेकर रा. कुंबेफळ ता. केज. जि. बीड हे दिनांक २५ माहे ०४ सन २०२४ रोजी दोघे मौजे महात्मा ज्योतिबा फुलेनगर, भिवंडी, ठाणे येथे मयत झाले आहेत. अर्जदार यांनी हया कोर्टास सदरहु १. अंबादास दगड्डु पटेकर उर्फ पाटेकर रा. कुंबेफळ ता. केज. जि. बीड २. भागाबाई अंबादास पटेकर उर्फ पाटेकर रा. कुंबेफळ ता. केज. जि. बीड यांचे मृत्यू नंतर त्यांना शासकीय व निमशासकीय कार्यालयीन कामकाजाचा लाभ मिळणेसाठी वारस प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज विधिज्ञ एस.एस. देशपांडे यांचे मार्फत दाखल केला आहे.

अर्जदार : ०१. दीपक अंबादास पटेकर उर्फ पाटेकर वय- ४१ वर्षे, धंदा-मजुरी रा. कुंबेफळ ता. केज जि. बीड हा.मु. महात्मा ज्योतिबा फुलेनगर, नं. ०१ मान-सरोवर रोड, भिवंडी, ता. भिवंडी जि ठाणे

०२. बाबासाहेब अंबादास पटेकर उर्फ पाटेकर वय- ५९ वर्षे, धंदा-मजुरी रा. कुंबेफळ ता. केज जि. बीड हा.मु. महात्मा ज्योतिबा फुलेनगर, नं. ०१ मान-सरोवर रोड, भिवंडी, ता. भिवंडी जि ठाणे

त्यापेक्षा अर्जदाराशिवाय सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी हया कोर्टात हजर होउन आपल्या हरकती कळवाव्या, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरह मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबददूल लागलीच पुरावा घेउन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु १. अंबादास दगडु पटेकर उर्फ पाटेकर रा. कुंबेफळ ता. केज. जि. बीड २. भागाबाई अंबादास पटेकर उर्फ पाटेकर रा. कुंबेफळ ता. केज. जि. बीड यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात देईल.

आज दिनांक ८ माहे ०७ जुन २०२६
पु.ता. ३१/०८/२०२६

स्वाक्षरित/-
व.लिपीक

**शिक्का**

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**स.अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर, केज

# श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गड पर्यटन विकास आराखड्याच्या भूसंपादनाबाबत

## पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांच्याकडून महत्वपूर्ण आढावा

बीड (जिमाका)

हिंदू नाथ संप्रदायाचे आद्यपीठ असलेल्या श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गड (सावरगाव घाट, ता. आष्टी) येथील तीर्थक्षेत्र पर्यटन विकास आराखड्याचा आढावा नुकताच बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत घेण्यात आला. या बैठकीत गडाच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा पाऊल उचलत भूसंपादनासाठी लागणाऱ्या आवश्यक रक्कमेबाबत अंतिम निर्णय घेण्यात आला. तसेच भूसंपादनाचा सविस्तर प्रस्ताव त्वरित मंजुरीसाठी सादर करण्याचे आदेश त्यांनी प्रशासनाला दिले.

पर्यटन आराखड्याची पाहणी करताना पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांनी विकासकामांमध्ये मानवी दृष्टिकोन आणि मूलभूत सुविधांवर विशेष भर दिला. गडावर येणाऱ्या दिव्यांग भाविकांसाठी खास आणि सुलभ सोयी-सुविधा निर्माण कराव्यात, अशा सूचना त्यांनी दिल्या. यासोबतच संपूर्ण परिसरात चोवीस तास आरोग्य सुविधा आणि भाविकांसाठी शुद्ध व स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सोय तातडीने उपलब्ध करून देण्याचे निर्देश त्यांनी संबंधित विभागाला दिले. बैठकीत माहिती देताना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन म्हणाले की, आद्यनाथ चैतन्य मच्छिंद्रनाथ महाराज यांची संजीवन समाधी येथे असल्याने हे स्थळ देशभरातील करोडो नाथभक्तांचे मुख्य श्रद्धास्थान आहे. गडावर दरवर्षी फाल्गुन अमावस्या, ऋषीपंचमी आणि रंगपंचमी या उत्सवांना देशभरातून लाखो भाविक दर्शनासाठी हजेरी लावतात. यामध्ये फाल्गुन अमावस्येचा उत्सव अतिशय भावनिक आणि ऐतिहासिक दृष्ट्या मोठा असतो. जिल्हाधिकारी श्री.जॉन्सन यांनी स्पष्ट केले की, गडावरील दैनंदिन भाविकांची संख्या ६ हजारांपासून ते विशेष उत्सवाच्या दिवशी १० लाखांपर्यंत पोहोचते. त्यामुळे या विकास आराखड्यामध्ये गर्दीचे व्यवस्थापन वाहनतळ आणि वाहतूक कोंडी रोखणे या गोष्टींना सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. सर्वोच्च गर्दीच्या दिवसांचे व्यवस्थापन डोळ्यासमोर ठेवूनच हा आराखडा अंतिम केला जात आहे.

या बैठकीला जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान, आणि जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे हे प्रत्यक्ष उपस्थित होते. तर बीडचे खासदार बजरंग सोनवणे, आमदार सुरेश धस, यांच्यासह संबंधित विविध यंत्रणांचे अधिकारी ऑनलाइन पद्धतीने या बैठकीत सहभागी झाले होते.

प्रस्तावित विकास आराखड्यातील प्रमुख वैशिष्ट्ये:

प्रशासनाने तयार केलेल्या या सर्वसमावेशक विकास आराखड्यात खालील कामांचा समावेश करण्यात आला आहे.

प्रवेश व परिसर: भव्य महाद्वार, मुख्य मंदिर परिसर सुशोभीकरण आणि मुख्य प्रवेश अनुभव सुधारणे. आध्यात्मिक व शैक्षणिक: भव्य स्मारक, ऐतिहासिक संग्रहालय,



अभ्यासिका, ध्यानकक्ष आणि व्हीआयपी सुविधा. भाविकांचे कल्याण: सुसज्ज प्रसादालय, आधुनिक भक्त निवास, दुकाने आणि सुनियोजित गोशाळा. परिसर सौंदर्य: देव तलाव पुनरुज्जीवन, साईट व्ह्यूज आणि गडाकडे येणारे रुंद रस्ते. या बैठकीमुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मच्छिंद्रनाथ गडाच्या विकासाला आता गती मिळाली असून लवकरच हा भूसंपादन प्रस्ताव शासनाच्या अंतिम मान्यतेसाठी पाठवला जाणार आहे.

# वादळी पावसात सोलार प्रकल्पाचे मोठे नुकसान

पंचनाम्यानंतर कंपनीकडे भरपाईची शिफारस

बीड /प्रतिनिधी

दि. ९ जून २०२६ रोजी रात्री सुमारे ८.३० वाजण्याच्या सुमारास बीड तालुक्यातील घारगाव परिसरात वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस झाला. या नैसर्गिक आपत्तीत अनेक शेतकऱ्यांच्या शेतीपिकांसह विविध मालमत्तेचे मोठे नुकसान झाले.


घारगाव येथील शेतकरी बाळू विश्वनाथ बन यांच्या शेतात काही दिवसांपूर्वीच सौरऊर्जा (सोलार) प्रकल्प उभारण्यात आला होता. वादळानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांनी शेतात जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली असता, सोलार पॅनल व संबंधित उपकरणांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे निदर्शनास आले. अनेक पॅनल तुटून



निकामी झाले असून संपूर्ण सोलार व्यवस्था कार्यरत नसल्याचे आढळले.

या घटनेनंतर शेजारील शेतकरी, गावचे सरपंच तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक यांच्या उपस्थितीत घटनास्थळी प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामा करण्यात आला. पंचनाम्यात वादळी वाऱ्यामुळे झालेल्या नुकसानीची नोंद करण्यात आली.

सदर पंचनाम्याच्या आधारे नुकसानग्रस्त सोलार पॅनल बदलून मिळावेत तसेच आवश्यक ती भरपाई व मदत मिळावी, यासाठी संबंधित सोलार कंपनीकडे शिफारस करण्यात आली आहे. नैसर्गिक आपत्तीत झालेल्या नुकसानीची दखल घेऊन कंपनीने तातडीने नुकसानभरपाई देऊन नवीन पॅनल उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी शेतकरी बाळू विश्वनाथ बन यांनी केली आहे.



# बीड शहर पाणी पुरवठा योजनेत दोषी कंत्राटदारावर कारवाई करणार – उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार

बीड (जिमाका)

महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांनी अमृत-१ योजनेअंतर्गत बीड शहर पाणी पुरवठा योजनेचा सविस्तर आढावा घेतला. योजना मंजूर होऊनही बीड शहराला अद्याप पाणी मिळत नसल्याबद्दल त्यांनी तीव्र खंत व्यक्त केली. या योजनेची पूर्ण जबाबदारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची असल्याने, कामचुकार आणि दोषी संबंधित कंत्राटदारावर नियमानुसार तातडीने योग्य ती कारवाई करावी, असे कडक निर्देश त्यांनी यंत्रणेला दिले आहेत.

या आढावा बैठकीत नगरपरिषदेच्या थकबाकीचा मुद्दाही समोर आला. नगरपरिषदेची वीज बिलाची थकबाकी असल्याने महावितरणकडून वाढीव विद्युत भार मंजूर केला जात नाही, ज्यामुळे ही पाणी पुरवठा योजना सध्या पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होऊ शकलेली नाही, अशी माहिती यावेळी देण्यात आली. या बैठकीला जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान, आणि जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे हे प्रत्यक्ष उपस्थित होते. तर बीडचे खासदार बजरंग सोनवणे, आमदार विजयसिंह पंडित, आमदार प्रकाश सोळंके, आमदार सुरेश धस, आणि आमदार संदीप क्षीरसागर यांच्यासह संबंधित विविध यंत्रणांचे वरिष्ठ अधिकारी ऑनलाइन पद्धतीने या बैठकीत सहभागी झाले होते.

# सावरगाव तालुका गेवराई येथील पंधरा वर्षीय मुलीचा थांबवला

बीड /प्रतिनिधी

सावरगाव ता गेवराई जिल्हा बीड येथील पंधरा वर्षीय मुलीचा बालविवाह दि. ९/७/२६ रोजी सकाळी अकरा वाजता होणार आहे माहिती मिळाल्यानंतर मादळमोही पोलीस ग्रामविकास अधिकारी सावरगाव व तत्त्वशील कांबळे अध्यक्ष राजर्षी छत्रपती शाहू महाराज प्रतिष्ठान बीड तथा अधिकार मित्र जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड, ग्रामपंचायत सदस्य पोलीस पाटील सर्वांना मिळून बालविवाह होणाऱ्या ठिकाणी मुलीच्या घरी जाऊन माहिती घेतली असता आई-वडिलांशी व आजी आजोबा नातेवाईकाशी चर्चा केल्यानंतर त्यांनी सांगितले की आम्ही मुलीचा बालविवाह करणार नाही आज कुंकू टिळ्याचा कार्यक्रम आहे असे त्यांनी सांगितले त्यावेळी मुलीचे आई वडील आजी-आजोबा व इतर नातेवाईक उपस्थित होते.

त्या सर्वांना बालविवाह प्रतिबंधक कायदा २००६ यानुसार कुंकू टिळा साखरपुडा व बालविवाह इत्यादी बालकाच्या बालविवाह बाबतीत होणाऱ्या प्रत्येक गोष्टी ह्या कायद्यानुसार गुन्हा असून आपणास कोणताही कार्यक्रम करता येणार नाही असे सांगितले. त्यानुसार मुलीच्या आई-वडिलांनी सदर कार्यक्रम रद्द करण्याचे ठरवले. मुलीचे आई-वडील ऊस तोडणीला जातात असे त्यांनी सांगितले. त्यामुळे आम्हाला सहा महिने स्थलांतरित राहावे लागते. त्यामुळे समस्या निर्माण होते असे त्यांनी सांगितले. सदरील मुलगी नुकतीच दहावी पास झाली असून तिला ७८% मिळाले आहेत असे समजल्यानंतर तिला पुढील शिक्षण पूर्ण करण्यासाठी शासनाच्या विविध योजने विषयीची माहिती व मुलींचे वस्तीग्रह विषयीची माहिती मुलीचे आई-वडील नातेवाईक व आजी-आजोबा यांना देण्यात आल्यानंतर मुलीच्या आजोबांनी सदरील मुलीचे शिक्षण पूर्ण करण्याकरिता शासनाच्या वतीने मुलीच्या वस्तीगृहाची शिक्षणाची सोय करावी अशी विनंती केली.



त्यानुसार त्यांना स्व गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार महामंडळाच्या वतीने संत भगवान बाबा ऊसतोड कामगार मुलींचे वस्तीग्रह या ठिकाणी पुढील शिक्षणाची सोय मोफत करून देऊ असे सांगितल्यानंतर ते मुलीचे पुढचे शिक्षण करण्यासाठी तयार झाले.

प्रशासन फक्त बालविवाह थांबवणे एवढ्या पुरतेच मर्यादित नसून सदरील बालिकांचे पुनर्वसन करणे व त्यांना शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करत आहे. याकरिता बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली बालविवाह थांबवलेल्या प्रत्येक बालकाचा पुनर्वसनाचा आढावा घेतला जात असून ऊसतोड कामगार व इतर कामासाठी स्थलांतरित होत असलेल्या कामगारांनी अथवा त्यांच्या पाल्यांनी आपल्या बालकांच्या शिक्षणासाठी जिल्हा महिला बालविकास अधिकारी कार्यालय बीड, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण जिल्हा सत्र न्यायालय बीड, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालय बीड अथवा राजर्षी छत्रपती शाहू महाराज प्रतिष्ठान बीड यांच्याशी संपर्क साधावा व आपल्या विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणावे जेणेकरून ऊस तोडणी व इतर कारणांसाठी स्थलांतर,एकलपालक, व्यसनाधीनता,गरीबी अथवा इतर कारणामुळे कोणत्याही बालिकेचा बालविवाह होणार नाही याची दक्षता सर्व नागरिकांनी घ्यावी. सदरील बालविवाह थांबवण्यासाठी निंबाळकर विनोद ग्रामविकास अधिकारी सावरगाव, विजय परजणे पोलीस हेडकॉन्स्टेबल, संजय गुजर पोलीस हेडकॉन्स्टेबल, माधळमोही पोलीस चौकी अभिमान मिसाळ,ग्रामपंचायत सदस्य जनार्धन नागरगोजे, ग्रामपंचायत कर्मचारी बाल हक्क कार्यकर्ते तत्त्वशील कांबळे आदी उपस्थित होते.

## धर्माबादला प्रथमच मराठवाडा व्यापारी परिषदेचे यजमानपद

# मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांतील व्यापारी, उद्योजक व संघटनांचे पदाधिकारी २६ जुलै रोजी एकाच व्यासपीठावर

व्यापार क्षेत्रातील ज्वलंत प्रश्नांवर होणार सखोल मंथन

धर्माबाद / अशोक पडोळे

शहराच्या व्यापारी इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद होईल असा महत्त्वपूर्ण सोहळा रविवार, दि. २६ जुलै २०२६ रोजी पार पडणार आहे. मराठवाडा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेली भव्य मराठवाडा व्यापारी परिषद प्रथमच धर्माबाद येथे होत असून, या परिषदेचे आयोजन राजाराम काकानी सहकार विद्या मंदिर, धर्माबाद येथे करण्यात आले आहे.

मराठवाड्यातील नांदेड, हिंगोली, परभणी, जालना, छत्रपती संभाजीनगर, बीड, धाराशिव (उस्मानाबाद) आणि लातूर या आठही जिल्ह्यांतील व्यापारी, उद्योजक, औद्योगिक क्षेत्रातील प्रतिनिधी, विविध व्यापारी संघटनांचे पदाधिकारी तसेच व्यावसायिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे धर्माबाद हे त्या दिवशी संपूर्ण मराठवाड्याच्या व्यापारी चळवळीचे केंद्रबिंदू ठरणार आहे.

परिषदेत व्यापाऱ्यांसमोरील विविध महत्त्वाच्या प्रश्नांवर सखोल चर्चा होणार आहे. बँकिंग व्यवहारातील अडचणी, रोख रकमेच्या देवाणघेवाणीतील समस्या, डिजिटल व्यवहारांची सुरक्षितता, जीएसटी व करप्रणालीतील बदल, उद्योग क्षेत्रातील नवीन धोरणे, एमआयडीसी परिसरातील वीजटंचाई व लोडशेडिंग, लघु व मध्यम उद्योगांसमोरील आर्थिक अडचणी, तसेच व्यापारी हिताच्या विविध विषयांवर तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत.

बदलत्या आर्थिक आणि तांत्रिक युगात व्यापाऱ्यांनी नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार करून व्यवसाय अधिक सक्षम, सुरक्षित आणि स्पर्धात्मक कसा करावा, याविषयीही मार्गदर्शन करण्यात येणार आहे. व्यापाऱ्यांच्या विविध समस्या शासन आणि संबंधित विभागांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी आवश्यक ठरावही परिषदेत मांडले जाणार आहेत.

धर्माबादला प्रथमच हा मान मिळाल्यामुळे स्थानिक व्यापाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, या परिषदेच्या माध्यमातून मराठवाड्यातील व्यापार क्षेत्राला नवी दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

मराठवाड्यातील सर्व व्यापारी बांधवांनी या ऐतिहासिक परिषदेचा लाभ घ्यावा, मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या समस्या, सूचना व मते मांडावीत आणि व्यापार क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी योगदान द्यावे, असे आवाहन नांदेड जिल्हा व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष श्री. सुबोध ओमप्रकाशजी काकाणी यांनी केले आहे.

व्यापारी ऐक्य, उद्योगवृद्धी आणि मराठवाड्याच्या आर्थिक विकासाला चालना देणारी ही परिषद राज्यातील व्यापारी चळवळीसाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

# राष्ट्रपुरुषांविषयी आक्षेपार्ह पोस्ट, १२ तासांत आरोपी जेरबंद, काय घडलं पहा

अहिल्यानगर । प्रशांत बाफना

समाजमाध्यमांवर छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी आक्षेपार्ह पोस्ट प्रसारित झाल्याप्रकरणी पाथर्डी पोलिसांनी तत्परता दाखवत अवघ्या १२ तासांत आरोपीला अटक केली. सूरज बाबासाहेब वांढेकर (वय ३६) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून, तांत्रिक तपासाच्या आधारे त्याने दुसऱ्या व्यक्तीच्या समाजमाध्यम खात्याचा गैरवापर करून संबंधित पोस्ट प्रसारित केल्याचे निष्पन्न झाले आहे.

बुधवारी (दि. ८) संबंधित आक्षेपार्ह पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल होताच पाथर्डी शहरासह तालुक्यात तीव्र संतापाची लाट उसळली. विविध सामाजिक संघटना, कार्यकर्ते आणि नागरिकांनी या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त करत संबंधितांवर कठोर कारवाईची मागणी केली.

या घटनेच्या निषेधार्थ पाथर्डी शहरातून भव्य मोर्चा काढण्यात आला. आंदोलकांनी घोषणाबाजी करत पाथर्डी पोलीस ठाण्यावर धडक दिली आणि दोषींना तातडीने अटक करण्याची मागणी केली. निवेदनाद्वारे वेळेत कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला. त्यावेळी पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांनी सखोल तपास करून दोषींवर कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले. घटना घडल्यानंतर आंदोलकांना दिलेल्या आश्वासनानुसार तातडीने तपास पूर्ण करून आरोपीला अटक करण्यात आल्याने पाथर्डी पोलीस, सायबर सेलच्या कार्यक्षमतेचे कौतुक होत आहे.

# वाढदिवसानिमित्त दर्ग्यावर चादर चढवत मेघदादा पाटील यांच्या दीर्घायुष्यासाठी विशेष दुआ

भाजपा अल्पसंख्याक मोर्चाचा अनोखा उपक्रम

धाराशिव : प्रतिनिधी

धाराशिव येथील तेरणा युथ फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा युवा नेते मेघदादा पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पक्ष अल्पसंख्याक मोर्चाच्या वतीने हजरत ख्वाजा शमशुद्दीन यांच्या पवित्र दर्ग्यावर चादर अर्पण करून त्यांच्या उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि समाजसेवेतील कार्याला अधिक यश लाभावे, अशी विशेष दुआ करण्यात आली.

सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि सर्वधर्मसमभावाचा संदेश देणारा हा उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. मेघदादा पाटील यांनी युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच विविध सामाजिक उपक्रमांद्वारे केलेल्या कार्याबद्दल उपस्थितांनी गौरवोद्गार काढले. त्यांच्या नेतृत्वामुळे अनेक युवकांना समाजकार्यात प्रेरणा मिळत असल्याचे मतही यावेळी व्यक्त करण्यात आले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपा अल्पसंख्याक मोर्चाचे शहराध्यक्ष श्री फर्मान काझी होते. प्रमुख उपस्थितीमध्ये आलीम पठाण (तालुका उपाध्यक्ष),



बिलाल रजवी, उपसरपंच सरफराजभाई, बबलूभाई, मुजमील काझी, फिरोज पठाण, महमूद मुजावर, जाकिर पठाण, इलियास पीरजादे, आरेफ मुजावर तसेच प्रा. पटेल सर यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.कार्यक्रमाच्या शेवटी भाजपा अल्पसंख्याक मोर्चाचे शहर उपाध्यक्ष फहाद सिद्दीकी यांनी उपस्थित मान्यवर, कार्यकर्ते व नागरिकांचे मनःपूर्वक आभार मानले. हा कार्यक्रम धार्मिक सौहार्द, सामाजिक ऐक्य आणि जनसेवेचा संदेश देणारा ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केले.

**शिक्षक भरती**

**पी.एम.श्री प्राथमिक व माध्यमिक प्रशाला**

**शहागड ता. अंबड जि.जालना**

उच्च प्राथमिक इयत्ता ६ वी ते ८ वी विभागासाठी अस्थायी /अंशकालीन शिक्षक भरती

शासन निर्णयानुसार पात्र व इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.
आवश्यक पात्रता...शासन निर्णयानुसार...
अर्ज १२/०७/२०२६ दिनांका पर्यंत जमा करावेत.अर्ज सादर करण्याचा
अंतिम दिनांक १२/०७/२०२६

अर्ज सादर करण्याचे ठिकाण :
मुख्याध्यापक पी.एम.श्री प्राथमिक व माध्यमिक प्रशाला शहागड ता.अंबड जि.जालना.
टीप : अंतिम दिनांका नंतर प्राप्त होणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

स्वाक्षरीत/-
मुख्याध्यापक
पी.एम.श्री प्राथमिक व माध्यमिक प्रशाला,
शहागड जिल्हा जालना

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# सौ.ऐश्वर्याताई धस व सौ.डॉ.गौरीताई धस यांच्या उपस्थितीत पिंपळवंडीतील खेळ पैठणी स्पर्धेला अभूतपूर्व प्रतिसाद

## दौलतवाडीच्या अश्विनी राजेंद्र पवार ठरल्या होम मिनिस्टर

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आ. सुरेश आण्णा धस यांचे कट्टर समर्थक तसेच सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रिय असलेले अंमळनेर जिल्हा परिषद गटाचे नेते भाऊसाहेब (आण्णा) भवर यांच्या वाढदिवसानिमित्त पिंपळवंडी येथे आयोजित करण्यात आलेल्या होम मिनिस्टर - खेळ पैठणी या महिलांसाठीच्या बहारदार कार्यक्रमाला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. विविध खेळ, मनोरंजन, आकर्षक बक्षिसे आणि महिलांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे हा कार्यक्रम परिसरातील संस्मरणीय ठरला. अंतिम फेरीत उत्कृष्ट कामगिरी करत दौलतवाडीच्या अश्विनी राजेंद्र पवार यांनी होम मिनिस्टरचा मान पटकावला.

मंगळवार, दि. ७ जुलै रोजी सायंकाळी पिंपळवंडी येथील माऊली लॉन्स येथे आयोजित करण्यात आलेला हा कार्यक्रम तब्बल साडेतीन ते चार तास रंगला. कार्यक्रमाला सौ. ऐश्वर्याताई जयदत्त धस आणि सौ. डॉ. गौरीताई सागर धस यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांच्या उपस्थितीमुळे महिलांमध्ये विशेष उत्साह निर्माण झाला असून कार्यक्रमाला महिला सक्षमीकरणाची प्रभावी जोड मिळाली. प्रसिद्ध सिनेअभिनेते क्रांती नाना मळेगावकर यांनी आपल्या खास शैलीत विविध खेळ, विनोद, प्रश्नमंजुषा, संवाद आणि मनोरंजनाची मेजवानी सादर केली. प्रत्येक फेरीत महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविल्याने संपूर्ण परिसर टाळ्यांच्या कडकडाटाने आणि जल्लोषाने दुमदुमून गेला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी सौ. रेखाताई भवर यांनी सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सौ. शितलताई निलेश मोरे, सरपंच, पिंपळवंडी या होत्या.

यावेळी बोलताना सौ. ऐश्वर्याताई जयदत्त धस यांनी महिलांना घरातील जबाबदाऱ्यांबरोबरच आनंद, संवाद आणि एकोप्याचे व्यासपीठ उपलब्ध होणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले. अशा कार्यक्रमांमुळे महिलांना दैनंदिन धकाधकीतून आनंदाचे क्षण मिळतात आणि सामाजिक बांधिलकी अधिक दृढ होते, असे त्यांनी नमूद केले.

सौ. डॉ. गौरीताई सागर धस यांनी आपल्या मनोगतात महिलांच्या




कलागुणांना वाव देणारे, त्यांना आनंदाचे क्षण देणारे आणि परस्परांतील स्नेह वृद्धिंगत करणारे कार्यक्रम निश्चितच कौतुकास्पद असल्याचे सांगितले. अशा उपक्रमांमुळे महिला सक्षमीकरणाला चालना मिळत असून समाजात सकारात्मक वातावरण निर्माण होत असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले.

कार्यक्रमाला सौ. चंपावती काकी पानसंबळ (भाजप ज्येष्ठ नेत्या), सौ. रूपालीताई किरण शिंदे पाटील (सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, पाटोदा), सौ. दिपालीताई राजू जाधव (नगराध्यक्षा, नगरपंचायत पाटोदा), सौ. शितलताई निलेश मोरे (सरपंच, पिंपळवंडी) यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, लोकप्रतिनिधी आणि हजारो महिला उपस्थित होत्या.

भाऊसाहेब (आण्णा) भवर यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाचे नियोजन सौ. रेखाताई भवर यांनी अत्यंत नेटके व शिस्तबद्ध पद्धतीने केले. त्यांच्या नियोजनाचे उपस्थितांनी विशेष कौतुक केले.

वाढदिवसानिमित्त भाऊसाहेब भवर मित्रमंडळाच्या वतीने अंमळनेर जिल्हा परिषद गटातील महिलांना तब्बल ९ हजार साड्यांचे वितरण करण्यात आले. महिलांना सन्मानाची भेट देत सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमादरम्यान विविध खेळ, प्रश्नमंजुषा आणि मनोरंजक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. पैठणीसह विविध आकर्षक बक्षिसांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. अंतिम फेरीत उत्कृष्ट कामगिरी करत दौलतवाडीच्या अश्विनी राजेंद्र पवार यांनी होम मिनिस्टरचा किताब पटकावला. विजेत्या महिलांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

समारोपप्रसंगी भाऊसाहेब (आण्णा) भवर यांनी उपस्थित सर्व मान्यवर, महिला भगिनी, सहकारी, मित्रपरिवार आणि पावसाची पर्वा न करता मोठ्या संख्येने उपस्थित राहिलेल्या नागरिकांचे मनःपूर्वक आभार मानले. जनतेचे प्रेम, विश्वास आणि आशीर्वाद हीच माझी खरी संपत्ती असून भविष्यातही समाजोपयोगी उपक्रम अधिक जोमाने राबविण्याचा प्रयत्न राहील, असे भावनिक मनोगत त्यांनी व्यक्त केले.



# बदामराव पंडित यांच्या नेतृत्वाखाली दैठण येथील युवकांचा भाजपात प्रवेश

## राष्ट्रवादी काँग्रेसला खिंडार

गेवराई ( प्रतिनिधी ) गेवराई विधानसभा मतदारसंघातील मौजे दैठण येथील राष्ट्रवादी काँग्रेसच्या युवक कार्यकर्त्यांनी भाजपा नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या नेतृत्वाखाली भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला आहे. युवानेते रोहित पंडित आणि युवा नेते यशराज पंडित यांनी त्यांचे स्वागत केले आहे.तुमची आमची भाजपा सर्वांची भाजपा म्हणत दैठण येथील राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा कार्यकर्ते माऊली पंडित, बळीराम पंडित, कृष्णा पंडित, सुदर्शन गायकवाड, महेश देशमुख आणि दीपक पंडित यांनी आपल्या सहकाऱ्यांसह माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केला आहे. यावेळी युवा नेते रोहित पंडित आणि युवा नेते यशराज पंडित यांनी त्यांचे सत्कार करून, भारतीय जनता पार्टीमध्ये स्वागत केले. गावाच्या विकासासाठी आणि सर्वसामान्यांच्या प्रश्न सोडविण्यासाठी आम्ही माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या नेतृत्वाखाली यापुढे काम करणार आहोत. प्रत्येकाच्या अडीअडचणीला ते सतत धावून येतात अशा खंबीर नेतृत्वाची सामान्यांना गरज असल्याच्या भावना, भाजपात प्रवेश केलेल्या या तरुणांनी व्यक्त केल्या. कोणतीही अडचण आली तर तिथेच आमच्यापर्यंत पोहोचवा ती सोडवण्याचा आम्ही प्रामाणिक प्रयत्न करू अशी ग्वाही यावेळी रोहित पंडित आणि यशराज पंडित यांनी दिली. याप्रसंगी शरद पंडित, जगदीश पंडित, विश्वराज पंडित, सुशील जामकर, सचिन पंडित आणि सह ग्रामस्थ आणि भाजपा कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते.

# जलजीवनचा कोट्यावधींचा घोटाळा

## राज्यातील पहिल्याच कारवाईत अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे ६ अधिकारी निलंबित

अहिल्यानगर/ प्रशांत बाफना

जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने केलेल्या जलजीवन योजनेच्या कामातही गंभीर त्रुटी, मोठ्या प्रमाणात आर्थिक अनियमितता आढळून आल्याने जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागातील कार्यकारी अभियंत्यासह सहा अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई केली आहे.

जलजीवनच्या पाणीपुरवठा योजनेच्या कामात त्रुटी व आर्थिक अनियमितता आढळून आल्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या चार अधिकाऱ्यांवर कारवाईनंतर जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे अधिकारीही निलंबित करण्यात आल्याने अहिल्यानगर जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. जलजीवन बाबतची राज्यातील ही पहिलीच कारवाई आहे.

कोट्यावधी रुपये खर्च करुनही लोकांना जलजीवन योजनेच्या पाणी पुरवठा योजनांतून पाणी मिळाले नाही. यामुळे अखिल भारतीय मराठा महासंघाचे प्रदेशाध्यक्ष संभाजी दहातोंडे पाटील यांनी तक्रार केली होती. पहिल्या टप्प्यात तपासणीत निकृष्ट कामे, गंभीर त्रुटी, आर्थिक विषमता आढळल्याने जबाबदार धरुन व पुढील निपक्ष चौकशी करता यावी यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधीकरण योजनेचे कार्यकारी अभियंता, तत्कालीन कार्यकारी अभियंता, संगमनेर विभागाचे कार्यकारी अभियंता व नेवासा उपविभागाचे उपअभियंता असे चार अधिकारी निलंबित केले.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सोबत जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागानेही पाणी पुरवठा योजनांची कामे केली. जिल्हा परिषदेकडे जलजीवनच्या ८३० योजना आहेत. त्यापैकी सात सदस्य समितीने १० तालुक्यांतील ५३३ योजना पैकी १६ योजनांची खर्चाच्या अनुषंगाने व १५ योजनांची गुणवत्तेच्या दृष्टाने झालेल्या तपासणी गंभीर त्रुटी, आर्थिक मोठी तफावत आढळली आहे. ज्या योजनांवर मुख्य निरीक्षणे व स्ट्रक्चरल निरीक्षणे नोंदविण्यात आली तेथे तपासणीत निकृष्ट कामे, गंभीर त्रुटी, आर्थिक विषमता आढळल्याने जबाबदार धरुन व पुढील निपक्ष चौकशी करता यावी यासाठी अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागातील कार्यकारी अभियंता एच. बी. चव्हाण, तत्कालीन प्रभारी कार्यकारी अभियंता एस. एस. गडधे, उपअभियंता पी. आर. संवत्सरकर, उप अभियंता आर. पी. पीसे, तत्कालीन शाखा अभियंता डी. व्ही. परदेशी, तत्कालीन उपअभियंता पी. बी. जायभाये यांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे सचिव रंगा नायक यांनी निलंबित केले आहे.

शासनाकडून मोठ्या प्रमाणात निधी मिळूनही लोकांना जलजीलनच्या योजनांतून पाणी मिळाले नाही. कामे व्यवस्थित केली नाहीत. शिवाय खर्च केलेल्या पैशात व कामांत तफावत आढळणे गंभीर बाब आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्वतः लक्ष घालून अहिल्यानगर जिल्ह्यातील जलजीवनच्या कामाची चौकशी आणि कारवाई करत आहेत. या योजनेतून ज्या-ज्या अधिकाऱ्यांनी आर्थिक लाभ उठवला त्यांच्यावर कारवाई झालीच पाहीजे. आता काही लोकांवर कारवाई झाली, पण सर्व दोषींवर कारवाई व्हावी आणि शासनाचे कोट्यवधी रुपये वाया घातले. त्याची संबंधिताकडून वसुली झाली पाहिजे अशी मागणी आहे

# भवरवाडीच्या श्री ज्ञानेश्वर संस्थानच्या नवीन रथासह पंढरपूर विठ्ठल-रुक्मिणी मठाच्या कामासाठी भाविकांचा सढळ प्रतिसाद

## रथासाठी ५१ हजार ६०० रुपयांची देणगी,मंदिर बांधकामही वेगात

आष्टी - (एस. राजेंद्र लाड) भवरवाडी येथील प्रसिद्ध श्री ज्ञानेश्वर संस्थानच्या वतीने उभारण्यात येत असलेल्या नवीन रथासाठी तसेच पंढरपूर येथील विठ्ठल-रुक्मिणी मठाच्या बांधकामासाठी दानशूर भाविकांकडून मोठ्या प्रमाणावर सहकार्य मिळत असून धार्मिक कार्यासाठी समाजातून दातृत्वाचा ओघ कायम असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. विविध गावांतील भाविकांनी सढळ हाताने दिलेल्या देणग्यांमुळे संस्थानचे महत्त्वाकांक्षी धार्मिक उपक्रम वेगाने पूर्णत्वाकडे वाटचाल करत आहेत.



श्री ज्ञानेश्वर संस्थान, भवरवाडी यांच्या नवीन रथाच्या निर्मितीसाठी रत्नागिरी, नान्नज, पारनेर, कराड आणि आष्टी परिसरातील तब्बल २२ दानशूर भाविकांनी एकत्रितपणे ५१ हजार ६०० रुपयांची देणगी दिली आहे. या पवित्र कार्यात सहभागी झालेल्या सर्व देणगीदारांबद्दल संस्थानच्या वतीने कृतज्ञता व्यक्त करण्यात आली आहे.

रथासाठी रघुनाथ मोहळकर (नान्नज) आणि प्रकाशशेठ जाधव (रत्नागिरी) यांनी प्रत्येकी ११ हजार रुपये, पप्पूशेठ मयेकर (रत्नागिरी) यांनी ५ हजार रुपये, तर रोहित कोकवणकर (रत्नागिरी), अनिल खापले (रत्नागिरी), बबन माने (रत्नागिरी) आणि किशोर घाणेकर (रत्नागिरी) यांनी प्रत्येकी २ हजार ५०० रुपये देणगी दिली आहे.

तसेच सुहास कांबळे (रत्नागिरी), शिवाजी चोपडे (कराड), महादेव नाईक (नान्नज), सुदाम मोहळकर (नान्नज), नाना नाळे (नान्नज), दिगंबर मोहळकर (नान्नज), शिवाजी मोहळकर (नान्नज), अर्जुन मोहळकर (नान्नज), सुनिल पवार (पारनेर), स्वप्निल पवार (पारनेर), राजेंद्र पवार, सोन्याबापू धोंडे (पारनेर), अक्षय साळवे (पारनेर) आणि सौ. राणी महादेव रासकर (आष्टी) यांनी प्रत्येकी १ हजार रुपये, तर सौ. उमा दिनेश धोंडे (आष्टी) यांनी ५०० रुपयांची देणगी अर्पण केली आहे. अशा प्रकारे रथासाठी एकूण ५१ हजार ६०० रुपयांचा निधी जमा झाला आहे.

संस्थानच्या वतीने सर्व देणगीदारांच्या धार्मिक भावना आणि दातृत्वाचे कौतुक करण्यात आले असून, सर्वसामान्य भाविकांच्या सहकार्यामुळेच देवस्थानची विकासकामे प्रगतीपथावर असल्याचे सांगण्यात आले. आगामी धार्मिक उत्सवांमध्ये हा नवीन रथ भाविकांसाठी विशेष आकर्षण ठरेल, असा विश्वासही संस्थानने व्यक्त केला आहे. तसेच या पुण्यकार्यात अधिकाधिक भाविकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन मठाधिपती भागवताचार्य ह.भ.प. कांताताई सोनटक्के महाराज यांनी केले आहे.

दरम्यान, आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर पंढरपूर येथील विठ्ठल-रुक्मिणी मठामध्ये मंदिर बांधकाम व छतावर पत्रे ठोकण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असून, या कामासाठीही अनेक दानशूर भाविकांनी आर्थिक मदत व साहित्य स्वरूपात योगदान दिले आहे. आगामी वारीमध्ये हजारो वारकरी आणि भाविकांची सोय व्हावी, या उद्देशाने मठाचे काम वेगाने पूर्ण करण्यासाठी सर्वजण प्रयत्नशील आहेत. मठाच्या कामासाठी श्री. सुनील अशोक वारगुंळे (भवरवाडी) यांनी नवीन रथासाठी २ हजार १०० रुपयांची रोख देणगी दिली आहे. तसेच ह.भ.प. हनुमंत महाराज झगडे (सोलेवाडी), श्री. नारायण आबा झगडे, ह.भ.प. महावीर महाराज घुले, लक्ष्मण तात्या झगडे आणि परमेश्वर तात्या सोनटक्के यांनी प्रत्येकी एक पत्रा मठाच्या छतासाठी दान दिला आहे. या सर्व दानशूर भाविकांचे मठाच्या वतीने आभार मानण्यात आले असून, विठ्ठल-रुक्मिणी चरणी त्यांच्या सुख, समृद्धी आणि आयुष्यवृद्धीसाठी प्रार्थना करण्यात आली आहे.

मठामध्ये विठ्ठल-रुक्मिणी मंदिराचे बांधकाम अंतिम टप्प्याकडे वाटचाल करत असून, वारीपूर्वी काम पूर्ण करण्यासाठी भाविकांनी आर्थिक तसेच साहित्य स्वरूपात सहकार्य करावे, असे आवाहन ह.भ.प. कांताताई सोनटक्के महाराज यांनी केले आहे. धार्मिक श्रद्धा, समाजातील एकोपा आणि दानशूर वृत्तीचे हे प्रेरणादायी उदाहरण असल्याची भावना भाविकांमधून व्यक्त होत आहे.

# ज्ञानराधा मल्टीस्टेट प्रकरणी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली सकारात्मक बैठक

## ठेवीदारांना न्याय देण्यासाठी शासन कटिबद्ध - आ.सुरेश धस



आष्टी - (एस.राजेंद्र लाड) ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या सभासद व ठेवीदारांच्या हितासंदर्भातील विविध प्रलंबित मुद्द्यांवर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. ना. श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवार, दि. ९ जुलै २०२६ रोजी विधानभवन, मुंबई येथे सविस्तर व सकारात्मक बैठक पार पडली. या बैठकीत ठेवीदारांना न्याय मिळावा, प्रकरणातील तपासाला गती मिळावी तसेच जप्त मालमत्तेच्या कार्यवाहीस वेग देण्यासाठी आवश्यक प्रशासकीय व कायदेशीर उपाययोजनांबाबत सखोल चर्चा करण्यात आली.

या बैठकीला उपस्थित राहून आ. सुरेश आण्णा धस यांनी ज्ञानराधा मल्टीस्टेट प्रकरणातील ठेवीदारांच्या अडचणी व विविध महत्त्वाचे प्रश्न मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्यासमोर प्रभावीपणे मांडले. ठेवीदारांच्या हिताचे संरक्षण, त्यांना त्यांच्या कष्टाच्या ठेवी परत मिळण्यासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजना तसेच प्रकरणातील तपास व न्यायप्रक्रियेला गती देण्याची मागणी त्यांनी केली.

बैठकीदरम्यान प्रकरणातील तपासाची सद्यस्थिती, जप्त करण्यात आलेल्या मालमत्तेच्या पुढील कार्यवाहीचा आढावा, संबंधित विभागांमधील समन्वय तसेच ठेवीदारांना लवकरात लवकर न्याय मिळण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रशासकीय आणि कायदेशीर बाबींवर सखोल विचारविनिमय करण्यात आला. शासनाने या प्रकरणाकडे अत्यंत गांभीर्याने पाहिले असून ठेवीदारांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी व्यक्त केला.

यावेळी संबंधित यंत्रणांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या असून तपास आणि प्रशासकीय कार्यवाही अधिक वेगाने पूर्ण करण्यासाठी शासन स्तरावर सकारात्मक भूमिका घेण्यात येत असल्याचे स्पष्ट करण्यात आले. ठेवीदारांच्या न्यायासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्नशील असून आवश्यक ती सर्व मदत व सहकार्य केले जाईल, असेही बैठकीत नमूद करण्यात आले.

या महत्त्वपूर्ण बैठकीस मंत्री मा. ना. श्री. बाबासाहेब पाटील, राज्यमंत्री मा. ना. श्री. योगेश कदम, राज्यमंत्री मा. ना. श्री. पंकज भोयर, खासदार श्री. बजरंग सोनवणे, आमदार रोहित पवार, आमदार प्रविण दरेकर, आमदार प्रकाश साळुंखे, आमदार विजयसिंह पंडित, आमदार संदीप क्षीरसागर, श्री. अक्षय मुंदडा यांच्यासह सहकार विभाग, गृह विभाग, महाराष्ट्र पोलीस, अंमलबजावणी संचालनालय (ईडी), सहकार आयुक्त कार्यालय तसेच बीड जिल्हा प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

ज्ञानराधा मल्टीस्टेट प्रकरणातील ठेवीदारांना न्याय मिळवून देण्यासाठी शासनाची भूमिका सकारात्मक असून, विविध यंत्रणांच्या समन्वयातून पुढील कार्यवाही अधिक वेगाने पूर्ण होईल, अशी अपेक्षा या बैठकीनंतर व्यक्त केली जात आहे.

# आ.सुरेश धस यांच्या पुढाकाराने श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथगड विकासकामांचा आढावा

## उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या उपस्थितीत महत्त्वपूर्ण बैठक



आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी तालुक्याचे आराध्य दैवत असलेल्या श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गडाच्या सर्वांगीण विकासासाठी सुरू असलेल्या विविध कामांचा आढावा घेण्यासाठी आ. सुरेश धस यांच्या पुढाकाराने पालकमंत्री तथा राज्याच्या उपमुख्यमंत्री मा. सुनेत्राताई पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली. या बैठकीत गडावर सुरू असलेल्या तसेच प्रस्तावित विकासकामांचा सविस्तर आराखडा सादर करण्यात आला.बैठकीत भक्तनिवासाचे बांधकाम, प्रसादालय उभारणी, आधुनिक स्वच्छतागृहांची निर्मिती, मंदिराचा जीर्णोद्धार, अंतर्गत रस्त्यांचे बांधकाम व परिसर सुशोभीकरण, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, विद्युत सुविधा, भाविकांसाठी आवश्यक मूलभूत सोयी-सुविधा तसेच गडाच्या सर्वांगीण विकासासाठी हाती घेण्यात येणाऱ्या विविध कामांचा सखोल आढावा घेण्यात आला.

यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांनी प्रत्येक विकासकामाची सद्यस्थिती जाणून घेत संबंधित अधिकाऱ्यांना गुणवत्तापूर्ण व निर्धारित वेळेत कामे पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. तसेच आगामी काळात श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गडाचा विकास धार्मिक, सांस्कृतिक आणि पर्यटनाच्या दृष्टीने आदर्श ठरेल, यासाठी शासनाकडून आवश्यक ते सर्व सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

आ. सुरेश धस यांनी श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गड हे लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असल्याने येथे येणाऱ्या भाविकांना आधुनिक व दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देणे ही काळाची गरज असल्याचे सांगत, विकासकामे गतीने पूर्ण करण्यासाठी शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा करण्यात येत असल्याचे नमूद केले.

या बैठकीस उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री मा. सुनेत्राताई पवार, उपमुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव राजेशजी देशमुख, खा. बजरंग सोनवणे, आ. प्रकाश (दादा) सोळंके, सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगरचे मुख्य अभियंता सुनील चव्हाण, सार्वजनिक बांधकाम विभाग, आष्टीचे कार्यकारी अभियंता कृष्णा पानसंबळ, वास्तुविशारद हेमंत पाटील तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीमुळे श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गडाच्या विकासकामांना अधिक गती मिळणार असून, भाविकांसाठी आवश्यक असलेल्या सर्व सुविधा टप्प्याटप्प्याने उपलब्ध करून गडाचे धार्मिक, सांस्कृतिक व पर्यटनदृष्ट्या वैभव अधिक वृद्धिंगत करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# जळगाव सपकाळमध्ये डेअरी माफियांची मनमानी उध्वस्त तुकाराम मुंढेंची धडक कारवाई मातोश्री डेअरीवर गुन्हा दाखल

## शेतकऱ्यांनी रस्त्यावर सांडले हजारो लिटर दूध व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर प्रशासन हादरले

भोकरदन इसरारखान पठाण :-

जळगाव सपकाळ ता. भोकरदन येथे गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेला दूध उत्पादक शेतकऱ्यांचा छळ आणि डेअरीचालकांची अरेरावी अखेर प्रशासनाच्या दणक्यामुळे मोडीत निघाली आहे. सर्व डेअरीचालकांनी संगनमत करून शेतकऱ्यांचे दूध नाकारल्याने संतप्त बळीराजाने थेट रस्त्यावर हजारो लिटर दुधाची धार सोडून तीव्र निषेध नोंदवला. या थरारक आंदोलनाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होताच, ॲक्शन मोड मध्ये आलेल्या अन्न व औषध प्रशासनाने एफडीए ने मोठी कारवाई करत भेसळ करणाऱ्या मातोश्री डेअरी वर गुन्हा दाखल केला असून ६३८ लिटर भेसळयुक्त दूध नष्ट केले आहे.आणि जळगाव सपकाळचा रस्ता दुधाने पांढरा झाला गेल्या तीन दिवसांपासून गावातील सर्व डेअरीचालकांनी संगनमताने शेतकऱ्यांचे दूध घेण्यास अचानक नकार दिला. दूध दराचे भाव पाडण्यासाठी किंवा जाणूनबुजून शेतकऱ्यांना वेठीस धरण्यासाठी हा कट रचण्यात आल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. दररोज होणारे हजारो रुपयांचे नुकसान असह्य झाल्याने शेकडो शेतकऱ्यांनी रात्री ११ वाजता ग्रामपंचायतीजवळील पत्र्याच्या शेडपाशी एकत्र येत संताप व्यक्त केला.भाव द्या किंवा दूध परत घ्या पण असं सांडू नका असा टाहो फोडत एका शेतकऱ्याने हातात माईक घेऊन डेअरी माफियांच्या मनमानीवर हल्लाबोल केला. भररस्त्यात लाल कॅनमधून पांढरेशुभ्र दूध ओततानाचे आणि मोटरसायकलींच्या गराड्यात शेतकऱ्यांच्या डोळ्यांतील अश्रू स्पष्ट करणारे व्हिडिओ सोशल मीडियावर वाऱ्यासारखे पसरले आणि संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली.आयएएस तुकाराम मुंढेंचा थेट प्रहार भेसळबाजांचे धाबे दणाणले

शेतकऱ्यांच्या या आक्रोशाची दखल थेट महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनाचे एफडीए आयुक्त आयएएस तुकाराम मुंढे यांनी घेतली. त्यांच्या आदेशानुसार जळगाव सपकाळ येथील मातोश्री दूध डेअरी वर धडक कारवाई करण्यात आली. तपासणीदरम्यान डेअरीतील दुधात भयानक भेसळ आढळून आल्याने प्रशासनाने ६३८ लिटर दूध जप्त करून ते जागीच नष्ट केले. तसेच मातोश्री डेअरीच्या चालकांविरोधात गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पत्रकार परिषदेत कडक इशारा देताना आयुक्त तुकाराम मुंढे म्हणाले शेतकऱ्यांच्या घामाच्या दुधात भेसळ करणाऱ्यांना आणि त्यांची अडवणूक करणाऱ्यांना कोणतीही सवलत दिली जाणार नाही. कायद्याचा बडगा असाच चालत राहील. नागरिकांना शुद्ध अन्न आणि शेतकऱ्यांना न्याय देणे हेच आमचे प्राधान्य आहे.

रमेश शेठ सपकाळ आणि अधिकाऱ्यांची धावपळ शेतकऱ्यांना तात्कालिक दिलासा

दूध कोंडीमुळे शेतकरी हवालदील झालेला असतानाच, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष चे भोकरदन तालुकाध्यक्ष रमेश शेठ सपकाळ यांनी तात्काळ मैदानात उतरून जालना आणि छत्रपती संभाजीनगर येथील दुग्ध विकास विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधला.

त्यांच्या या मध्यस्थीनंतर एफएसओ डॉ. अंजू नागरे मॅडम, जिल्हा दुग्ध विकास अधिकारी नितीन कुलकर्णी



छत्रपती संभाजीनगर आणि कराळे संभाजीनगर विभाग यांनी अत्यंत तत्परता दाखवली. अधिकाऱ्यांच्या विशेष निर्देशानुसार भोकरदन येथील अमृत डेअरी मध्ये जळगाव सपकाळच्या सुमारे ५०० लिटर दुधाची तातडीने व्यवस्था करण्यात आली. प्रशासनाच्या या जलद कृतीमुळे शेतकऱ्यांचे पुढील नुकसान टळले असून शेतकऱ्यांनी डॉ. अंजू नागरे व नितीन कुलकर्णी यांचे जाहीर आभार मानले आहेत.

हे सरकारचे धोरण की शेतकऱ्यांची थट्टा? रात्रीच्या बैठकीत शेतकऱ्यांचा एल्गार

दरम्यान रात्री उशिरा झालेल्या शेतकऱ्यांच्या सभेत डेअरीचालक आणि शासनाच्या धोरणांवर तीव्र आक्षेप घेण्यात आला. शेतकऱ्यांनी दूध व्यवसाय वाढवावा म्हणून एकीकडे राज्य सरकार आवाहन करते आणि दुसरीकडे दुग्ध विकास विभागाच्या नाकाखाली खाजगी डेअरीचालक संगनमत करून दूध नाकारतात ही शासनाच्याच धोरणाविरोधातील शेतकरीविरोधी कृती आहे अशी तोफ शेतकऱ्यांनी डागली.

शेतकऱ्यांची अंतिम मागणी

शासनाने डेअरी चालकांच्या या मनमानीला कायमचा लगाम घालण्यासाठी गावात सरकारी किंवा अधिकृत हक्काची दूध संकलन यंत्रणा उभी करावी जेणेकरून शेतकरी राजाचे नुकसान होणार नाही. अन्यथा हा केवळ इशारा असून आगामी काळात हे आंदोलन अधिक तीव्र आणि आक्रमक होईल असा सज्जड दम जळगाव सपकाळच्या शेतकऱ्यांनी दिला आहे.

## महाराष्ट्र राज्य पतसंस्थेच्या उपाध्यक्षपदी भरतजी नळगे जालना संघटनेकडून जंगी सत्कार

परतुर प्रतिनिधी :- महाराष्ट्र राज्य वीज तांत्रिक कामगार संघटनेचे एकनिष्ठ व सक्रिय सभासद तसेच जालना जिल्ह्याचे भूमिपुत्र भरतजी नळगे यांची महाराष्ट्र राज्य वीज तांत्रिक कामगार सहकारी पतसंस्था मर्यादित मराठवाडाच्या उपाध्यक्षपदी निवड झाल्याने वीज तांत्रिक कामगारांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यांच्या या मानाच्या निवडीबद्दल जालना जिल्हा तांत्रिक कामगार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी शाल पुष्पहार व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा उत्साहात सत्कार करत अभिनंदन केले.



यावेळी बोलताना पदाधिकाऱ्यांनी श्री. नळगे यांच्या नेतृत्वगुणांवर व संघटनात्मक अनुभवावर विश्वास व्यक्त केला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पतसंस्थेचे कामकाज अधिक पारदर्शक, गतिमान व सभासदाभिमुख होईल तसेच कर्मचारी आणि सभासदांच्या हिताचे निर्णय प्रभावीपणे राबविले जातील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.उपाध्यक्षपदी निवड झाल्यानंतर श्री.भरतजी नळगे यांनी संघटनेतील सर्व पदाधिकारी कार्यकर्ते आणि सभासदांनी व्यक्त केलेल्या विश्वासाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. पतसंस्थेच्या प्रगतीसह सभासदांचे आर्थिक हित जपण्यासाठी प्रामाणिकपणे कार्य करण्याचा निर्धार त्यांनी यावेळी व्यक्त केला.

या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी श्री. नळगे यांच्या पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छांचा वर्षाव करत त्यांच्या नेतृत्वाखाली पतसंस्था अधिक सक्षम आणि प्रगतिशील वाटचाल करेल असा विश्वास व्यक्त केला. जालना जिल्हा तांत्रिक कामगार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांकडून झालेला हा सत्कार सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

## पेपरट्रॉनिक किटमुळे विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची गोडी वाढणार



जामखेड प्रतिनिधी , विलास जाधव :-

अंबड तालुक्यातील जामखेड येथील जिल्हा परिषद प्रशालेत बुधवारी (दि. ८) अगस्त्या इंटरनॅशनल फाउंडेशन व टाटा पॉवर यांच्या संयुक्त विद्यमाने इयत्ता सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना 'पेपरट्रॉनिक' किटचे वितरण करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक रामप्रसाद शेळके होते. यावेळी अगस्त्या इंटरनॅशनल फाउंडेशनचे समन्वयक प्रवीण राठोड तसेच शाळेतील सर्व शिक्षक उपस्थित होते. प्रारंभी ३६ विद्यार्थ्यांना किटचे वाटप करण्यात आले असून, २०० विद्यार्थ्यांना किट देण्याचे नियोजन असल्याची माहिती प्रवीण राठोड यांनी दिली.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाविषयी आवड निर्माण होऊन त्यांच्या सर्जनशीलतेला चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त केला आहे.

## इतिहासाचा वारसा की शासनाच्या उदासीनतेची साक्ष भोकरदनची ऐतिहासिक तुकाई लेणी' शेवटच्या घटका मोजतेय

### हजारो वर्षांचा वैभवशाली इतिहास पाण्यात गाळात आणि कमालीच्या दुर्लक्षात पुरातत्त्व आणि पर्यटन विभागाच्या घोषणाबाजी'ची पोलखोल

भोकरदन इसरारखान पठाण :-

मराठवाड्याच्या मातीला इतिहासाचा सुवर्णगंध आहे आणि त्यात भोगवर्धन म्हणजेच आजचे भोकरदन हे सातवाहनकालीन वैभवाचे जिवंत प्रतीक मानले जाते. याच भूमीने हजारो वर्षांचा सांस्कृतिक आणि पुरातत्त्वीय ठेवा आपल्या उरात जपला आहे. मात्र अत्यंत खेदाची बाब म्हणजे याच सातवाहन काळातील वैभवाची साक्ष देणारी ऐतिहासिक तुकाई लेणी आज शासकीय अनास्था यंत्रणेचे दुर्लक्ष आणि कमालीच्या उपेक्षेची शिकार झाली आहे.ज्या लेण्यांनी इतिहास घडताना पाहिला त्या लेण्या आज स्वत:च्या अस्तित्वासाठी आणि संवर्धनासाठी प्रशासनाकडे आर्त हाक मारत आहेत

पर्यटनाच्या मोठमोठ्या घोषणा पण प्रत्यक्ष कृती मात्र शून्य

भोकरदन शहरापासून अवघ्या काही किलोमीटर अंतरावर असलेली तुकाई लेणी म्हणजे शिल्पकला कोरीव स्तंभ आणि प्राचीन मूर्तींचा अद्भुत संगम आहे. पर्यटकांना भुरळ पाडणारे आणि इतिहास अभ्यासकांसाठी संशोधनाचे मोठे केंद्र बनण्याची क्षमता असलेले हे ठिकाण आज पूर्णपणे पोरके झाले आहे. शासनाकडून पर्यटनाच्या नावाखाली कोट्यवधींच्या घोषणा केल्या जातात मात्र तुकाई लेणीच्या बाबतीत या योजना केवळ कागदावरच मर्यादित राहिल्याचे विदारक चित्र आहे.तर आज हे चित्र दिसले नसते

आज जर कोणी तुकाई लेणीच्या परिसरात गेले तर तिथे पाऊल ठेवतानाही अंगावर काटा येतो.



पाणी आणि गाळाचे साम्राज्य लेण्यांच्या आत आणि बाहेर मोठ्या प्रमाणावर पाणी साचले असून संपूर्ण परिसर गाळ आणि कचऱ्याच्या विळख्यात सापडला आहे.मूलभूत सुविधांचा दुष्काळ येथे पोहोचण्यासाठी नीट रस्ते नाहीत पिण्याच्या पाण्याची सोय नाही की साधा एक माहितीफलकही लावण्याची तसदी प्रशासनाने घेतलेली नाही.

सुरक्षेचा रामभरोसे कारभार ऐतिहासिक शिल्पांचे रक्षण करण्यासाठी कोणतीही सुरक्षा व्यवस्था नाही. परिणामी समाजकंटकांकडून होणारी तोडफोड आणि नैसर्गिक झीज यामुळे हा अमूल्य ठेवा नष्ट होण्याच्या मार्गावर आहे.

हे केवळ दगड नाहीत आपली अस्मिता आहेइतिहासतज्ज्ञ आणि अभ्यासकांच्या मते या लेण्या म्हणजे केवळ दगड-धोंडे नसून आपल्या पूर्वजांनी मागे सोडलेला संस्कृतीचा अमूल्य वारसा आहेत. आपल्या पुढील पिढ्यांना दाखवण्यासाठी ही आपली अस्मिता आहे. जर आज आपण याकडे दुर्लक्ष केले तर उद्या हा वारसा कायमचा नष्ट होईल आणि केवळ खंत व्यक्त करण्याशिवाय आपल्या हाती काहीच उरणार नाही.

आता आंदोलनाचा पवित्रा जनतेचा सवाल शासन कधी जागे होणार

राज्य पुरातत्त्व विभाग किंवा युनेस्कोने या लेणीकडे गांभीर्याने का पाहिले नाही? असा संतप्त सवाल आता स्थानिक नागरिक, इतिहासप्रेमी आणि सामाजिक संघटनांमधून उपस्थित होत आहे. या पार्श्वभूमीवर आता एकजुटीने खालील मागण्यांसाठी रान उठवले जात आहे.पुरातत्त्व विभागाने तातडीने वैज्ञानिक पद्धतीने लेणीची स्वच्छता व संवर्धन करावे.पर्यटन विकास पर्यटन विभागाने विशेष निधी मंजूर करून येथे मूलभूत सुविधा रस्ते आणि प्रकाश व्यवस्था करावी.

सुरक्षा आणि माहिती केंद्र स्थानिक प्रशासनाने येथे तात्काळ सुरक्षा रक्षक नेमावेत आणि पर्यटकांसाठी माहिती केंद्र सुरू करावे.नाहीतर मानाचा तुरा कायमचा पुसला जाईल

तुकाई लेणी वाचवा इतिहास जपा वारसा टिकवा ही केवळ घोषणा नसून भोकरदनच्या जनतेची आर्त हाक आहे. जर आजच प्रशासनाने ठोस पावले उचलली नाहीत तर भोकरदनच्या माथ्यावरील हा ऐतिहासिक मानाचा तुरा कायमचा पुसला जाईल.

जोपर्यंत तुकाई लेणीला न्याय मिळत नाही तोपर्यंत आमचा हा लेखणीचा आणि लोकशाहीचा लढा थांबणार नाही. शासन जोपर्यंत ठोस पावले उचलत नाही तोपर्यंत आम्ही याचा तीव्र पाठपुरावा करत राहू असा इशारा स्थानिक इतिहासप्रेमींनी दिला आहे.

## ऊस उभा आईचा संघर्ष सुरू

### घुंगर्डे हादगाव येथे महिला शेतकऱ्याचे कुटुंबासह धरणे आंदोलन ऊस गाळप होईपर्यंत जमिनीचा ताबा देऊ नका अशी आर्त मागणी

घुंगर्डे हादगाव प्रतिनिधी :-

अंबड तालुक्यातील घुंगर्डे हादगाव येथील गट क्रमांक २४५ मधील महाराष्ट्र शासनाच्या पुनर्वसन जमिनीवर उभ्या असलेल्या उसाचे पीक गाळप होईपर्यंत जमिनीचा ताबा देऊ नये या मागणीसाठी गोंदी भाग्यनगर येथील महिला शेतकरी हेमा हनुमंत वाघमारे यांनी आपल्या लहान मुलांसह धरणे आंदोलन सुरू केले आहे. गेल्या चार दिवसांपासून ऊन वारा आणि पावसाची पर्वा न करता संपूर्ण कुटुंब आंदोलनस्थळी ठिय्या देऊन बसले असून या आंदोलनाने परिसराचे लक्ष वेधून घेतले आहे.हेमा वाघमारे यांच्या ताब्यात सध्या ८१ आर पुनर्वसन जमीन असून त्या जमिनीत ऊसाचे पीक उभे आहे. हे पीक गाळप होण्यापूर्वीच जमिनीचा ताबा घेण्यात आल्यास कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा आधारच हिरावला जाईल आणि उपासमारीची वेळ येईल अशी व्यथा त्यांनी व्यक्त केली.

विशेष म्हणजे या आंदोलनात त्यांच्यासोबत मुलगा सुयोग हनुमंत वाघमारे १४, मुलगी



सृष्टी हनुमंत वाघमारे १२ आणि चिमुकला संबोधी हनुमंत वाघमारे ४ हेही सहभागी आहेत. ऊन वारा आणि पावसात चार दिवसांपासून लहान मुलांसह सुरू असलेले हे धरणे आंदोलन प्रशासनाच्या संवेदनशीलतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करत आहे.

उभ्या पिकासकट जमिनीचा ताबा देणे म्हणजे आमच्या कुटुंबाचा घास हिरावून घेण्यासारखे आहे. ऊस गाळप होईपर्यंत आम्हाला न्याय द्यावा अशी आर्त मागणी हेमा वाघमारे यांनी केली आहे.

दरम्यान या आंदोलनाची प्रशासनाने तातडीने दखल घेऊन संबंधित शेतकरी कुटुंबाला न्याय द्यावा अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

## गॅस गोदामांवर डल्ला मारणारी आंतरजिल्हा टोळी गजाआड जालना पोलिसांची धडाकेबाज कारवाई

जालना आणि परभणीतील सिलेंडर चोरीचे गुन्हे उघड ६० गॅस सिलेंडरसह १.६६ लाखांचा मुद्देमाल जप्त

जालना शेख फारुक :-

जिल्ह्यात गॅस गोदामांचे टाळे तोडून सिलेंडर चोरणाऱ्या एका आंतरजिल्हा टोळीचा जालना स्थानिक गुन्हे शाखेने अत्यंत शिताफीने पर्दाफाश केला आहे. या धडक कारवाईत पोलिसांनी दोन सराईत चोरांना बेड्या ठोकल्या असून, त्यांच्याकडून तब्बल १,६६,९२० रुपये किमतीचे ६० गॅस सिलेंडर जप्त केले आहेत. पोलिसांच्या या आक्रमक कारवाईमुळे गुन्हेगारांचे धाबे दणाणले आहेत.आणि चोरांची गॅस गळती झाली

गत २९ जून २०२६ रोजी घनसावंगी तालुक्यातील कुंभारपिंपळगाव येथे अज्ञात चोरट्यांनी एच.पी.गॅसचे गोदाम फोडून ६० सिलेंडर चोरून नेले होते. याप्रकरणी गोपाल राधेश्याम लोया यांच्या तक्रारीवरून घनसावंगी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. हा गुन्हा उघड करण्याचे थेट आदेश पोलीस अधीक्षक श्री. तेघबीर सिंह संधू यांनी स्थानिक गुन्हे शाखेला दिले होते. एलसीबीचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव व त्यांच्या पथकाने तांत्रिक विश्लेषण आणि गुप्तहेरांचे जाळे वापरून थेट परभणी गाठले. पाथरी जि. परभणी येथून राजेश लाला पवार वय ३४ आणि गणेश प्रभु काळे वय २६ या दोघांना त्यांच्या साथीदारांसह ताब्यात घेतले. पोलिसांच्या खाक्या दाखवताच त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली.

परभणीतही ठोकला होता डल्ला

पोलिसी खाक्या मिळताच या चोरट्यांनी केवळ जालनाच नव्हे तर परभणी जिल्ह्यातील इडेन गॅस गोदामाचे' कुलूप तोडूनही सिलेंडर चोरल्याची कबुली दिली आहे.उघड झालेले गुन्हे: घनसावंगी पोलीस ठाणे गु.र.नं. ३६०/२०२६ आणि पाथरी पोलीस ठाणे गु.र.नं. १५६/२०२६.

जप्त मुद्देमाल १,६६,९२० रुपये किमतीचे ३६ भरलेले आणि २४ रिकामे घरगुती एच.पी. गॅस सिलेंडर. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक श्री.तेघबीर सिंह संधू,अप्पर पोलीस अधीक्षक श्री.विक्रम साळी, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. सिद्धेश्वर धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली एलसीबीचे पोनि पंकज जाधव,सपोनि सचिन खामगळ, पोउपनि राजेंद्र वाघ आणि अंमलदार सॅम्युअल कांबळे, लक्ष्मीकांत आडेप, सुधीर वाघमारे, सागर बाविस्कर,दत्ता वाघुर्डे, शिवप्रसाद एखांडे,सतिष श्रीवास,कैलास चेके यांनी ही धडाकेबाज कामगिरी फत्ते केली.आरोपींना पुढील कारवाईसाठी घनसावंगी पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले असून या टोळीने आणखी कुठे हात साफ केला आहे का याचा कसून तपास सुरू आहे.



# नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक निवडणुकीत किनवट मतदारसंघावर न्यायालयीन सुनावणीची छाया

## राजू सुरोशे यांच्या उमेदवारीविरोधातील याचिकेवर १३ जुलैला पुढील सुनावणी ; सहकार क्षेत्रासह तालुक्याच्या राजकारणी मंडळीचे लक्ष औरंगाबाद खंडपीठाकडे

**किनवट । प्रतिनिधी । दि. ९ : नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळ निवडणुकीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचली असून विविध तालुका व जिल्हास्तरीय मतदारसंघांतून दाखल झालेल्या नामनिर्देशन पत्रांची छाननी पूर्ण झाली आहे. या पार्श्वभूमीवर किनवट तालुक्यातील प्राथमिक कृषी पतपुरवठा व विकास सेवा सहकारी संस्था/अधिकोष सहकारी संस्था मतदारसंघातील एका उमेदवारीवर न्यायालयीन वाद निर्माण झाल्याने या मतदारसंघाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**



या मतदारसंघातून वैध नामांकन ठरलेले राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे सक्रिय सदस्य, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक तथा घोटी ग्रामपंचायतीचे उपसरपंच राजू लक्ष्मणराव सुरोशे यांच्या उमेदवारीला आव्हान देण्यात आले आहे. याच मतदारसंघातील भारतीय जनता पक्षाचे सक्रिय कार्यकर्ते व आदिवासी सेवा सोसायटी घोटी येथिल प्रतिनिधी यशवंत क–हाळे पाटील यांनी या संदर्भात मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात रिट याचिका क्र. ७४३२/२०२६ दाखल केली आहे. ही याचिका ड. शैलेश गंगाखेडकर यांच्या माध्यमातून दाखल करण्यात आली आहे. या प्रकरणाची सुनावणी ८ जुलै २०२६ रोजी न्यायमूर्ती एस. जी. चपळगावकर यांच्या दालनात झाली. यावेळी न्यायालयाने पुढील सुनावणी १३ जुलै २०२६ रोजी ठेवली आहे. या प्रकरणातील न्यायालयाचा निर्णय केवळ संबंधित उमेदवारीपुरता मर्यादित न राहता जिल्हा बँक निवडणुकीच्या राजकीय समीकरणांवर परिणाम करू शकतो, असा अंदाज सहकार क्षेत्रातील जाणकार व्यक्त करत आहेत. विशेषतः किनवट तालुक्यातील राजकीय घडामोडींना या निकालामुळे नवे वळण मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक निवडणुकीत १६ जुलैपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत असल्याने न्यायालयीन निर्णयानंतर कोणते उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात राहतात, कोणते गट किंवा पक्ष एकत्र येतात आणि अंतिम राजकीय समीकरणे कशी आकार घेतात, याकडे जिल्ह्यातील सहकार व राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. न्यायालयाच्या १३ जुलैच्या सुनावणीनंतर या प्रकरणाला कोणते वळण मिळते, यावरच किनवट मतदारसंघातील पुढील राजकीय रणनीती आणि संभाव्य उमेदवारीचे चित्र स्पष्ट होणार असल्याचे सहकार क्षेत्रातील जाणकारांचे मत आहे.



# चांगल्या कामाला पाठबळ, चुकीला माफी नाही – पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन

## अवैद्य धंदे संदर्भात कर्मचाऱ्यांना तंबी दिली

तामसा प्रतिनिधी : नांदेड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी तामसा पोलीस ठाण्याला भेट देऊन कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी त्यांनी गुन्हे नोंदणी, प्रलंबित प्रकरणे, कायदा व सुव्यवस्था, ई–एफआयआर, ई–साक्ष प्रणाली तसेच नागरिकाभिमुख सेवांची माहिती घेतली.

पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संवाद साधताना मनुष्यबळाची कमतरता, महिला पोलीस कर्मचारी रिक्त जागा आणि वाढत्या कामाच्या ताणासंदर्भातील अडचणी जाणून घेतल्या. प्रामाणिकपणे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पाठीशी प्रशासन खंबीरपणे उभे राहील, मात्र शिस्तभंग, हलगर्जीपणा व गैरप्रकार कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतले जाणार नाहीत, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला.

तपासाची गुणवत्ता वाढविणे, प्रकरणांची वेळेत पूर्तता करणे आणि पोलीस–जनता संबंध अधिक मजबूत करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. तामसा पोलीस ठाण्याच्या एकूण कामकाजाबाबत समाधान व्यक्त करत अधिक कार्यक्षम, शिस्तबद्ध व लोकाभिमुख पोलीसिंगसाठी प्रयत्न सुरू ठेवण्याचे आवाहन डॉ. रोहन यांनी केले.

# सन २६२७ साठी सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना लागू

## खरीप हंगाम २६२७ मध्ये ३१ जुलैपर्यंत सहभागी होण्याचे कृषी विभागाचे आवाहन

मुखेड /प्रतिनिधी

राज्य शासनाने सन २०२६२७ या आर्थिक वर्षासाठी सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना लागू केली असून, शासन निर्णय दि. ३ जुलै २६ नुसार खरीप हंगाम २०२६ साठी शेतकऱ्यांना योजनेत सहभागी होण्याचे आवाहन कृषी विभागाने केले आहे. हवामानातील अनिश्चितता आणि संभाव्य नैसर्गिक आपत्तींच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या आर्थिक संरक्षणासाठी ही योजना महत्त्वाची ठरणार आहे.

सुधारित योजनेनुसार अधिसूचित महसूल मंडळामध्ये चालू वर्षातील सरासरी उत्पादन हे उंबरठा उत्पादनापेक्षा कमी आल्यास शेतकऱ्यांना विमा नुकसानभरपाई मिळणार आहे.

खरीप हंगामात भात, ज्वारी, बाजरी, नागली, मूग, उडीद, तूर, मका, भुईमूग, तीळ, कारळे, सोयाबीन, कापूस आणि खरीप कांदा या एकूण १४ अधिसूचित पिकांसाठी विमा संरक्षण उपलब्ध राहणार आहे.

योजनेत सहभागी होण्यासाठी अन्नधान्य, कडधान्य व तेलबिया पिकांसाठी विमा संरक्षित रकमेच्या केवळ २ टक्के तर कापूस आणि कांदा या नगदी पिकांसाठी ५ टक्के विमा हप्ता भरावा लागणार आहे.

या योजनेत सहभागी होण्यासाठी ३१ जुलै २६ ही अंतिम मुदत असून, केंद्र शासनाच्या राष्ट्रीय पीक विमा पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करता येणार आहे. शेतकरी स्वतः, बँकेमार्फत किंवा सामूहिक सेवा केंद्रामार्फत अर्ज सादर करू शकतात.

योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांकडे ग्रीस्टॅक नोंदणी क्रमांक (फार्मर आयडी) असणे बंधनकारक आहे. तसेच जमीन कागदपत्रे, पीक लागवड घोषणापत्र, आधार क्रमांक आणि आधार संलग्न बँक खाते आवश्यक राहील.

डिजिटल क्रॉप सर्वे अंतर्गत पिकांची नोंद करणेही अनिवार्य करण्यात आले आहे. पीक आणि विमा अर्जातील पीक यामध्ये तफावत आढळल्यास डिजिटल क्रॉप सर्वेमधील नोंद अंतिम ग्राह्य धरली जाईल. तफावत असल्यास विमा अर्ज रद्द करण्यात येईल.

योजनेत चुकीच्या पद्धतीने अर्ज करून गैरफायदा घेतल्याचे आढळल्यास संबंधित शेतकऱ्यांना पुढील पाच वर्षे कृषी विभागाच्या विविध योजनांपासून वंचित राहावे लागणार आहे.

विमा योजनेत सहभागी होण्यासाठी किमान ०.१० हेक्टर क्षेत्रावर पीक लागवड असणे आवश्यक आहे. कर्जदार शेतकऱ्यांनी कर्ज मंजूर करणाऱ्या बँकेमार्फत विमा योजनेत सहभागी व्हावे. जर त्यांनी योजनेत सहभागी होण्याची इच्छा नसल्यास, त्यांनी विहित मुदतीत संबंधित बँकेस लेखी स्वरूपात कळविणे आवश्यक आहे.प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत अर्ज नोंदणीसाठी सामूहिक सेवा केंद्र चालकांना विमा कंपनीमार्फत प्रति अर्ज ६० रुपये मानधन दिले जाते. त्यामुळे शेतकऱ्यांनी विमा हप्त्याव्यतिरिक्त कोणतेही अतिरिक्त शुल्क देऊ नये, असे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे.योजनेबाबत अधिक माहितीसाठी संबंधित विमा कंपनी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, नजिकची बँक किंवा टोल फ्री क्रमांक १४४४७ वर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

यंदाच्या खरीप हंगामात हवामान खात्याने व्यक्त केलेल्या पावसाच्या अंदाजाच्या पार्श्वभूमीवर पिकांचे आर्थिक संरक्षण करण्यासाठी प्रधानमंत्री पीक विमा योजना अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी अंतिम मुदतीपूर्वी योजनेत सहभागी होऊन आपल्या पिकांचे विमा संरक्षण करून घ्यावे, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

# नांदेड- लातूर महामार्गावरील उड्डान पुला खालील मलबा ढासळला

## सुदैवाने दोन मुली बालबाल बचावले कीरोकळ जखमी

नांदेड जिल्हा प्रतिनिधी
अनिल धमने पाटील

नांदेड– लातूर महामार्गाचे काम प्रगती पथावर असून कामाचे शुभारंभ होण्या पुर्वीच निकृष्ट दर्जाच्या कामामुळे विष्णुपुरी येथील एसजीजीएस कॉलेजसमोरील मुख्य पुला खाली भिंत कोसळली व पुला खालील पुर्ण मलबा बाहेर अंतर्गत रस्तावर पडल्यामुळे गुरुवारी सकाळी १० वाजता भिंत कोसळली. यामुळे रस्त्यावरील वाहतूक काही काळ ठप्प झाली होती.

नदिड– लातूर महामार्गाचे काम सुरू असून अनेक ठिकाणी निकृष्ट दर्जाचा काम होत असल्याचे दिसून येत आहे तर गुरुवारी सकाळी ११ वाजता च्या दरम्यान विष्णुपुरी येथील एसजीजीएस कॉलेजच्या समोरील उड्डाणपुलाची १ भिंत अचानकपणे कोसळली या मध्ये कोणतीही जिवीत हानी झाली नसून मोठा अनर्थ टळला आहे तर काही वाहनावर दगड पडल्याचे समजते .



या निकृष्ट कामामुळे एखाद्या निष्पाप प्रवाशांचा बळी गेला असता तर याची जबाबदारी प्रशासन घेणार काय त्यामुळे प्रशासना सह ठेकेदार केटी आय एल यांच्या वर प्रशासनाने कठोर कारवाई करण्यात यावा असे नागरिकात तिव्र संताप व्यक्त केला जात होता नांदेड– लातूर महामार्गाचे काम करणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करावी अशी मागणी विष्णुपुरी येथील नागरिकांनी केली आहे. गुरुवारी सकाळी घडलेल्या या घटनेमुळे विष्णुपुरी येथून नांदेड शहरात येणाऱ्या सर्विस रोड बंद झाला होता.

तर या घटनेत २ विद्यार्थीनीं बाल बाल बचावल्या !

गुरूवारी सकाळी ११ च्या दरम्यान या उड्डाणपुलाचा एक मोटा भाग अचानक ढासळला, त्याच वेळी तेथून स्कुटीवरून २ महाविद्यालयीन विद्यार्थिनी कॉलेजला जात असल्याचे माहीती तेथिल नागरीकांनी सांगीतले मात्र भिंतीचा ढिगारा अंगावर पढेल असे समजताच व त्यांच्या अंगावर येताच दोन्ही मुली स्कुटीसह खाली पडल्या. मात्र, सुदैवाने या घटनेत दोन्ही मुलींनी स्वतःचा जीव वाचवित यश मिळविले. या थरारक घटनेमुळे दोन्ही मुली बाल बाल बचावले असून किरकोळ जखमी झाल्या मात्र जिव वाचला या परिस्थिती मुळे तेथिल उपस्थित नागरीकांनी संबंधित ठेकेदारावर कठोर करवाई करण्यात यावी अशी अपेक्षा अनेकांनी व्यक्त केल्या आहेत तर ईतवारा विभागाचे पोलीस उपधिक्षक प्रशांत शिंदे घटना स्थळी उपस्थित राहुन पूर्ण माहीती घेऊन ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक ओमकांत चिंचोळकर यांनी कडक बंदोबस्त ठेऊन पडलेला मलबा पुर्ण पणे बाजूला करून वाहतुक सुरळीत करून देण्यात सहकार्य केले आहेत .

# विशेष सखोल पुनर्निरीक्षण कार्यक्रमात हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही

## १८ बीएलओ व ३ पर्यवेक्षकांविरुद्ध होणार कार्यवाही – डॉ. सचिन खल्लाळ

नांदेड जिल्हा प्रतिनिधी ८७ नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघांतर्गत एकूण ३१२ मतदारयादी भागांमध्ये विशेष सखोल पुनर्निरीक्षण (डशिलळरश्र खपींशपीळींश ठशींळीळेप – डखठ) कार्यक्रमाची अंमलबजावणी सुरू आहे. या कामासाठी वारंवार सूचना देऊनही १८ बीएलओ (ईींह डर्शींशश्र जषषळलशी) व ३ पर्यवेक्षक यांची प्रगती अत्यंत कमी असल्याने त्यांच्याविरुद्ध नियमानुसार कार्यवाही करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली असल्याची माहिती मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ यांनी दिली.या कामासाठी नियुक्त करण्यात आलेल्या बीएलओ व त्यांच्या सहाय्यकांना उपस्थित राहण्यापासून अडवणूक करणाऱ्या संबंधित आस्थापना प्रमुखांनाही कारणे दाखवा नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशांचे पालन न केल्यास तसेच लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ मधील तरतुदीनुसार संबंधित कार्यालय प्रमुखांविरुद्धही शिस्तभंग व कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

याशिवाय, २५ बीएलओ व ६ पर्यवेक्षक यांची कामगिरी असमाधानकारक असल्याने त्यांनाही कारणे दाखवा नोटिसा देऊन खुलासा मागविण्यात आला आहे. दि. १० व ११ जुलै या दोन दिवसांत त्यांच्या कामात अपेक्षित प्रगती न झाल्यास भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार व लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ मधील तरतुदीनुसार संबंधितांविरुद्ध पुढील कार्यवाही प्रस्तावित करण्यात येणार आहे.

तसेच ज्या सहायक मतदार नोंदणी अधिकाऱ्यांची कामगिरी समाधानकारक नाही, त्यांच्या कामात दि. ११ जुलैपर्यंत सुधारणा न झाल्यास त्यांच्याविरुद्धही कार्यवाहीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल कर्डिले यांच्याकडे सादर करण्यात येणार असल्याचे डॉ. खल्लाळ यांनी सांगितले.

विशेष सखोल पुनर्निरीक्षण (डखठ) कार्यक्रमासाठी नियुक्त बीएलओ, त्यांचे सहाय्यक, पर्यवेक्षक तसेच सहायक मतदार नोंदणी अधिकारी यांनी भारत निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या वेळापत्रकानुसार विहित मुदतीत काम पूर्ण करणे बंधनकारक आहे. कामात निष्काळजीपणा अथवा दिरंगाई करणाऱ्या कोणत्याही अधिकारी किंवा कर्मचाऱ्याची गय केली जाणार नसून संबंधितांविरुद्ध कडक प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा मतदान नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ यांनी दिला.

# एकल पालकांच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप शिक्षणातूनच उज्ज्वल भविष्य घडवा– प्रा.ओमप्रकाश झांजरी

परतूर प्रतिनिधी :–

एकल पालकांच्या मुलांच्या शिक्षणाला बळ देण्यासाठी जालना एज्युकेशन फाउंडेशन आणि साऊ एकल समिती, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने परतूर येथील स्नेहांकुर प्रकल्प मापेगाव पुनर्वसन येथे परतूर व मंठा तालुक्यातील एकल पालकांच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.



यावेळी प्रमुख मार्गदर्शन करताना जालना एज्युकेशन फाउंडेशनचे ट्रस्टी तथा एकल पालक प्रकल्प प्रमुख प्रा. ओमप्रकाश झांजरी म्हणाले की कुटुंबाची आर्थिक परिस्थिती बदलण्याचा सर्वात सोपा प्रभावी आणि शाश्वत मार्ग म्हणजे शिक्षण. त्यामुळे एकल पालकांनी आपल्या पाल्यांच्या शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य द्यावे. सातत्यपूर्ण अभ्यास जिद्द आणि मेहनतीच्या बळावरच यश संपादन करता येते.

ते पुढे म्हणाले की शैक्षणिक साहित्याच्या माध्यमातून एकल पालकांवरील आर्थिक भार काही प्रमाणात कमी करण्याचा हा प्रयत्न असून विद्यार्थ्यांनी मागील वर्षापेक्षा अधिक गुण मिळवण्याचा निर्धार करून शिक्षणात सातत्य ठेवावे.

या कार्यक्रमात जालना एज्युकेशन फाउंडेशनचे समन्वयक रुक्मिणीकांत दीक्षित,सतीश काळे,साऊ एकल समितीचे जिल्हा समन्वयक तथा आधार बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष एकनाथ राऊत,आझाद बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष तय्यब पठाण,स्नेहांकुर प्रकल्पाचे संचालक प्रदीप कातारे यांच्यासह विविध मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद झळकला असून शिक्षणाच्या माध्यमातून उज्ज्वल भविष्य घडविण्याचा आत्मविश्वास त्यांच्यात निर्माण झाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# भूकंपाच्या पार्श्वभूमीवर नांदेड प्रशासन सतर्क नांदेड जिल्ह्यात जीवित व वित्तहानी नाही

## नागरिकांनी घाबरू नये, अफवांवर विश्वास ठेवू नये – पालकमंत्री अतुल सावे

नांदेड जिल्हा प्रतिनिधी हिंगोली, नांदेड व परभणी जिल्ह्यांमध्ये गुरुवार, दि. ९ जुलै २०२६ रोजी पहाटे १.३७, २.१५, २.१७ आणि ३.२३ वाजता भूकंपाचे सौम्य धक्के जाणवल्याची माहिती जिल्हा आपत्कालीन कार्यकेंद्रास प्राप्त झाली आहे.

भारतीय हवामान विभागाच्या अधिकृत माहितीनुसार, या भूकंपांची तीव्रता रिश्टर स्केलवर अनुक्रमे ४.६, ३.६, ३.९ आणि ४.१ इतकी नोंदविण्यात आली आहे. भूकंपाचा केंद्रबिंदू हिंगोली जिल्ह्यातील वसमत तालुक्यातील शिरली येथे होता.

या भूकंपामुळे नांदेड जिल्ह्यात कोणतीही जीवित अथवा वित्तहानी झालेली नाही. जिल्हा प्रशासनाने तत्काळ परिस्थितीचा आढावा घेतला असून सर्व संबंधित यंत्रणा सतर्क ठेवण्यात आल्या आहेत.

भूकंपाचे धक्के मध्यरात्रीनंतर जाणवल्याने बहुतांश नागरिक झोपेत होते. काही ठिकाणी सलग धक्के जाणवल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, नागरिकांनी घाबरून न जाता सतर्क राहावे, भूकंपाचे धक्के जाणवल्यास तत्काळ सुरक्षितरीत्या घराबाहेर पडून मोकळ्या जागेत थांबावे आणि प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

दरम्यान, नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे हे परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवून असून त्यांनी जिल्हा प्रशासनाशी संपर्क साधून आवश्यक सूचना दिल्या आहेत. नांदेड जिल्ह्यात कोणतीही जीवित किंवा वित्तहानी झालेली नसून नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, घाबरून जाऊ नये आणि केवळ अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवावा, असे आवाहन पालकमंत्री अतुल सावे यांनी केले आहे.

## आ. भीमराव केराम यांची धान/भरडधान्य

# शासकीय खरेदीस मुदतवाढ देण्याची मागणी

किनवट प्रतिनीधी

किनवट व माहूर या आदिवासी व दुर्गम तालुक्यांतील शेतकऱ्यांच्या हितासाठी रब्बी पणन हंगाम २०२५–२६ मधील धान/भरडधान्य शासकीय खरेदीस तात्काळ मुदतवाढ देण्यात यावी, अशी मागणी आमदार भीमराव केराम यांनी महाराष्ट्र राज्याचे पणन मंत्री ना. जयकुमार रावल यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, किनवट व माहूर तालुक्यांमध्ये शासकीय खरेदी प्रक्रिया उशिराने सुरू झाल्यामुळे अनेक शेतकऱ्यांना विहित मुदतीत आपला धान/भरडधान्याचा माल खरेदी केंद्रावर विक्री करता आला नाही. त्यामुळे आजही अनेक शेतकऱ्यांकडे मोठ्या प्रमाणात धान/भरडधान्य शिल्लक असून खरेदीची मुदत संपल्याने त्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे.आदिवासी व दुर्गम भागातील शेतकऱ्यांना वाहतूक, नोंदणी तसेच खरेदी प्रक्रियेत विविध अडचणींचा सामना करावा लागत असल्याने या विशेष परिस्थितीचा विचार करून शासकीय खरेदीस मुदतवाढ देणे आवश्यक असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

उर्वरित सर्व पात्र शेतकऱ्यांना हमीभावाने धान/भरडधान्य विक्रीची संधी मिळावी व त्यांचे आर्थिक नुकसान टळावे, यासाठी शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी विनंती आमदार भीमराव केराम यांनी केली आहे.या निवेदनाची प्रत जिल्हाधिकारी, नांदेड यांनाही माहितीस्तव पाठविण्यात आली आहे.